रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक १८६
www.ramprahar.com
मंगळवार, २१ जानेवारी २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२



**खालापूर : राज्याच्या वनमंत्रिपदी गणेश नाईक आणि भाजप महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्षपदी रवींद्र चव्हाण यांची निवड झाल्याबद्दल चौक येथील कर्जत फाटा मैदानात सोमवारी भाजपच्या वतीने आयोजित कार्यक्रमात त्यांचा सत्कार करण्यात आला. या सोहळ्यास आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आदी उपस्थित होते. या वेळी विविध पक्षांच्या अनेक पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला.** (वृत्त उद्याच्या अंकात)

# तळोजात आमदार आपल्या दारी!

## नागरिकांकडून उपक्रमाचे स्वागत अन् समाधान व्यक्त | नागरी समस्यांचे निराकरण करणार –आमदार प्रशांत ठाकूर

**तळोजा : रामप्रहर वृत्त**

तळोजा फेज १मध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांच्या संकल्पनेनुसार आमदार आपल्या दारी हा उपक्रम रविवारी (दि. १९) झाला. या उपक्रमाचे नागरिकांनी स्वागत करत समाधान व्यक्त केले. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी तळोजा परिसरातील नागरिकांच्या सर्व समस्या जाणून त्यांचे निराकरण करणार असल्याची ग्वाही दिली.

येत्या तीन महिन्यांनंतर पुन्हा एकदा या सर्व विषयांवर आढावा घेतला जाणार असून पुढील एक महिन्याच्या आत या सर्व समस्या सोडवण्यासाठी पाठपुरावा सुरू करून नागरिकांना विविध सुविधा उपलब्ध करून देणार असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले. त्याचबरोबर नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न भाजपचे पदाधिकारी पुढाकार घेऊन सोडवतील, असेही त्यांनी नागरिकांना आश्वासित केले.




पनवेल महापालिका आणि शासनाशी संबंधित असलेल्या विविध समस्या जाणून त्यांचे निराकरण करण्यासाठी आमदार आपल्या दारी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यानुसार तळोजा परिसरातील नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी तळोजा फेज १ सेक्टर ९मधील उद्यानात आमदार आपल्या दारी हा कार्यक्रम झाला. या वेळी नागरिकांनी सुरक्षा, पाणीटंचाई, नदी प्रदूषण, डेब्रिज, स्ट्रीट लाइट, बस डेपो, हवा प्रदूषण, क्रिकेट ग्राऊंड, रस्ते, भाजी मार्केट, गार्डन, रस्त्यांवरील खड्डे, प्रॉपर्टी टॅक्स, साफसफाई, सबवे मेंटनन्स, स्पीड ब्रेकर, पाणीपुरवठा, पब्लिक हेल्थ सेंटर यासह विविध विषय मांडले. या सर्व समस्या लवकरात लवकर सोडवण्यासाठी पाठपुरावा करणार असून तीन महिन्यांनंतर याबाबत पुन्हा एकदा आढावा घेणार असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले.



प्रत्येक महिन्यात एका शहरात आमदार आपल्या दारी हा उपक्रम राबवण्यात येणार असून लेखी स्वरूपात ज्यांनी प्रश्न विचारला आहे, त्यांना १० दिवसांमध्ये उत्तर देणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

एकूणच नागरिकांच्या समस्या आणि सूचनांचा विचार करून त्यांना योग्य ते सहकार्य आणि त्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याची ग्वाही आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिली. त्यामुळे या उपक्रमाचा नागरिकांनी स्वागत करत समाधान व्यक्त केले.

या वेळी भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, सरचिटणीस प्रल्हाद केणी, माजी नगरसेवक हरेश केणी, पापा पटेल, सरचिटणीस भूपेंद्र पाटील, निर्दोश केणी, संतोष पाटील, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, महिला मोर्चाच्या आशा बोसरे, अ‍ॅड. चेतन जाधव यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.



# नमो चषक स्पर्धेची तयारी अंतिम टप्प्यात

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी घेतला आढावा

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नावाने उलवे नोडमध्ये २३ ते २५ जानेवारीपर्यंत होणाऱ्या नमो चषक २०२५ भव्य क्रीडा सांस्कृतिक महोत्सवाची सर्व तयारी अंतिम टप्प्यात आली असून या संदर्भात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवारी (दि. २०) उलवे नोड येथे नमो चषक स्पर्धास्थळी अंतिम आढावा बैठक पार पडली.

पनवेल आणि उरण भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने नमो चषक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. त्या संदर्भात आयोजनातील विविध समित्यांची बैठक पार पडली. या बैठकीस भाजपचे उरण तालुका अध्यक्ष रवी भोईर, टीआयपीएलचे संचालक अमोघ ठाकूर, युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, भाजपचे जिल्हा चिटणीस चंद्रकांत घरत, उलवे नोड अध्यक्ष अमर म्हात्रे, विजय घरत, भार्गव ठाकूर, विश्वनाथ कोळी, हेमंत ठाकूर, सागर ठाकूर, कबड्डी प्रशिक्षक सुर्यकांत ठाकूर, क्रीडा प्रशिक्षक विनोद नाईक, विचुंबे ग्रामपंचायतीचे सरपंच प्रमोद भिंगारकर, शरीरसौष्ठवपटू दिनेश शेळके, मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे, ज्योत्सना ठाकूर, स्वप्नील ठाकूर, रोहित जगताप, किशोर पाटील, अंकुश ठाकूर, व्ही.के. ठाकूर, मदन पाटील, सुधीर ठाकूर, दिनेश खानावकर, रोहित जगताप, सुहास भगत, जयवंत देशमुख, हेमंत ठाकूर, धीरज उलवेकर, गौरव कांडपिळे, नाना देशमुख, सीमा पाटील यांच्यासह समितीचे पदाधिकारी उपस्थित होते. या नमो चषकात पाच हजारपेक्षा जास्त खेळाडूंचा सहभाग असणार असून या स्पर्धेचा लाखो क्रीडाप्रेमी लाभ घेतील.

### मैदानाची पाहणी, मार्गदर्शक सूचना

नमो चषक स्पर्धेच्या यशस्वी नियोजनासाठी विविध प्रकारच्या १७ समिती स्थापित करण्यात आल्या आहेत. त्या अनुषंगाने या समितीकडून आपापल्या कामाचा आढावा घेण्यात आला. उत्कृष्ट आणि भव्य आयोजनातून हा नमो चषक यशस्वीपणे करण्यासाठी समितीमधील प्रत्येक पदाधिकारी, कार्यकर्त्याने जबाबदारी पार पाडावी, अशी सूचना लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या वेळी केली. दरम्यान, त्यांनी येथे होणाऱ्या स्पर्धेच्या अनुषंगाने मैदानाची पाहणी केली तसेच मार्गदर्शक सूचना केल्या.

## निवडक

### बलात्कार, हत्या प्रकरणात आरोपी संजय रॉयला जन्मठेप

**कोलकाता :** येथील आर.जी. कर महाविद्यालय आणि रुग्णालयातील प्रशिक्षणार्थी महिला डॉक्टरवरील बलात्कार आणि हत्या प्रकरणातील आरोपी संजय रॉय याला सोमवारी (दि. २०) सियालदह न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली. ९ ऑगस्ट २०२४ रोजी आरोपी कर्मचाऱ्याने महिला डॉक्टरवर बलात्कार करून तिची हत्या केली होती. रुग्णालयाच्या टाऊन हॉलमध्ये या डॉक्टरचा मृतदेह अर्धनग्न अवस्थेत आढळला होता.

### मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर तीन दिवस वाहतूक ब्लॉक


**मुंबई :** यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर गर्डर अर्थात तुळई बसविण्याचे काम करण्यात येणार आहे. त्यासाठी २२ जानेवारी ते २४ जानेवारीपर्यंत दुपारी १२ ते ३ या वेळेत वाहतूक ब्लॉक घेण्यात येणार आहे. ब्लॉकच्या कालावधीत मुंबईहून पुण्याकडे जाणारी वाहतूक बंद राहणार असून ती इतर मार्गांवर वळवण्यात येणार आहे, तर पुण्याहून मुंबईकडे जाणारी वाहतूक सुरळीत सुरू राहणार आहे.

# उरणमध्ये तीन वर्षांच्या चिमुरडीवर लैंगिक अत्याचार

**उरण : बातमीदार, वार्ताहर**

उरणमध्ये तीन वर्षांच्या चिमुरडीवर शेजारी राहणाऱ्या नराधमाने लैंगिक अत्याचार केल्याची संतापजनक घटना समोर आली आहे. याबाबत मोरा सागरी पोलिसांनी आरोपी दिनेश सखाराम निवेतकर (वय ४८) याला अटक केली असून न्यायालयाने त्याला चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

उरण मोरा येथील फड नं. ५ झोपडपट्टी परिसरात पीडित चिमुकली कुटुंबासोबत राहते. १३ जानेवारीला आई या मुलीला अंगणवाडीतून घरी घेऊन आली व कपडे धुण्यासाठी घरात गेली. या वेळी मुलगी अंगणात खेळण्यास जाण्याकरिता रडू लागली. दरम्यान, शेजारी राहणारा दिनेश निवेतकर तेथे आला व त्याने मुलीला खेळण्यासाठी अंगणात सोडले. काही वेळाने आई काम आटोपून बाहेर आली, पण अंगणात मुलगी दिसत नाही पाहून तिने निवेतकरला विचारणा केली असता मुलगी गल्लीत खेळत असल्याचे त्याने सांगितले. आईने गल्लीत शोध घेतला, मात्र मुलगी दिसत नसल्याने पुन्हा विचारणा केल्यावर ती शौचालयाजवळ असल्याचे तो म्हणाला.



**नराधम अटकेत; चार दिवसांची पोलीस कोठडी**

आई मुलीला आणण्यासाठी गेली असता ती घाबरून आईला बिलगून जोरजोरात रडू लागली. आईने तिला घरी आणले. तिला ताप भरला म्हणून उरणमधील अभिनव चाईल्ड केअर क्लिनिकमध्ये नेले असता तेथील डॉ. अजय कोळी यांनी तापावर औषध दिले, पण तीन दिवसांनंतरही ताप उतरला नाही. दरम्यान, दिनेश काकाने शूच्या जागी हात लावल्याचे मुलीने सांगितले. त्यामुळे मुलीला उरणमधील गाडे हॉस्पिटलमध्ये नेले असता डॉ. प्रीती गाडे यांनी तिची पूर्ण तपासणी करून गुप्तांगावर जखमा असल्याचे लेखी पत्रच दिले. यानंतर आईने मोरा सागरी पोलीस ठाणे गाठून निवेतकर याच्याविरोधात फिर्याद नोंदविली. पोलिसांनी आरोपीला शनिवारी (दि. १८) अटक केली. याबाबत मोरा सागरी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ कलम ६२ (२), बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ कलम ४, ६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

### रायगड व नाशिक पालकमंत्र्यांच्या नियुक्तीला स्थगिती

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य सरकारच्या सामान्य प्रशासन विभागाने नाशिक आणि रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदाच्या नियुक्तीला स्थगिती दिली आहे. याबाबत रविवारी (दि. १९) रात्री उशिरा पत्रक जारी करून हा निर्णय घेण्यात आला.

राज्यातील पालकमंत्र्यांची नावे १८ जानेवारी रोजी जाहीर करण्यात आली होती. या नव्या पालकमंत्र्यांच्या यादीत अनेकांना सहपालकमंत्रीपदही मिळाले, तर काही जिल्ह्यांमध्ये मंत्र्यांना संधी देण्यात आली नाही. यानंतर आता नाशिक आणि रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदाच्या नियुक्तीला स्थगिती देण्यात आली आहे. दरम्यान, प्रजासत्ताक दिनी रायगड आणि नाशिक जिल्हा मुख्यालयी स्थगितीपूर्व नियुक्त पालकमंत्रीच ध्वजारोहण करणार आहेत.

# रेवदंडा येथील डिझेल तस्करीचा पर्दाफाश; पाच टँकर, दोन बोटींसह पाच जण कस्टम विभागाच्या ताब्यात

**अलिबाग, रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबागजवळच्या रेवदंडा येथील कुंडलिका खाडीत सोमवारी (दि. २०) पहाटे सीमा शुल्क विभागाच्या (कस्टम) पथकाने मोठी कारवाई करत डिझेल तस्करीचा पर्दाफाश केला. यात पाच टँकर आणि दोन बोटी जप्त करण्यात आल्या आहेत. या प्रकरणात पाच जणांना ताब्यात घेण्यात आल्याची माहिती मिळते आहे.

अरबी समुद्रमार्गे रेवदंडा खाडीतून डिझेल तस्करी होत असल्याची माहिती सीमा शुल्क विभागाला मिळाली होती. त्यानुसार कस्टमच्या पथकाने तेथे पाळत ठेवली आणि या सर्व डिझेल तस्करीचा भांडाफोड केला. या ठिकाणी डिझेल वाहून नेणारे ३२ हजार लिटर क्षमतेचे चार आणि पाच हजार लिटर क्षमतेचा एक असे पाच टँकर जप्त केले तसेच मासेमारी करणाऱ्या दोन बोटी ताब्यात घेतल्या आहेत. 'कुलदैवत साईखंडोबा' आणि जय धनलक्ष्मी नावाच्या या बोटींमधून



मासेमारीच्या नावाखाली खुलेआम बेहिशोबी डिझेलची वाहतूक केली जात होती. त्यासाठी कुंडलिका खाडीकिनारी रेवदंडा येथील जेटीचा वापर केला जात होता.

या कारवाईत पाच तस्करांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांना पुढील कारवाईसाठी मुंबई बंदरात नेण्यात आले आहे. जप्त हजारो लिटर डिझेलची किंमत कोट्यवधी रुपये आहे. या यशस्वी मोहिमेमुळे डिझेल तस्करी रोखण्यात सीमा शुल्क विभागाला यश आले आहे. या बोटी मुंबई बंदरात नेण्यात आल्याची माहिती असून आणखी एका बोटीचा शोध सुरू आहे.

# टीआयपीएल रोटरी प्रीमियर लीग उत्साहात

## माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते बक्षीस वितरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रोटरी प्रांत ३१३१मधील क्रिकेटप्रेमी सदस्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या टीआयपीएल रोटरी प्रीमियर लीगची सांगता रविवारी (दि. १९) कळंबोली येथील मैदानात झाली. पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते बक्षीस वितरण झाले. दरम्यान, या स्पर्धेला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन खेळाडूंचा उत्साह वाढवला व आयोजकांचे कौतुक केले.




(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

स्पर्धेत बीकेसी संघाने प्लॅटिनम ट्रॉफी पटकावली व बाश्री संघ उपविजेता ठरला. गोल्ड ट्रॉफी ही प्राईम दादा संघाने जिंकली व उपविजेतेपद आर.आर. संघाने मिळवले, तर सिल्वर ट्रॉफी पिंपरी इलिट संघाने प्राप्त केली व रिवेल संघ उपविजेता ठरला. त्याचबरोबर मालिकावीर प्रशांत तेलंगे, उत्कृष्ट फलंदाज दिग्विजय मोहिते, उत्कृष्ट गोलंदाज विजय कोतवाल, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक योगेश वाघ, उत्कृष्ट यष्टीरक्षक महेश उरणकर, ५० वर्षांवरील मालिकावीर गणेश कडू, सर्वाधिक षटकार प्रितम कैया, सर्वोत्तम झेल डॉ. आमोद दिवेकर या बक्षिसांचेही वितरण करण्यात आले.

पारितोषिक वितरण समारंभास श्रेयस दिक्षित, हर्मेश तन्ना, डॉ. आमोद दिवेकर, वसंत कोकणे, प्रशांत तुपे आदी उपस्थित होते. रोटरी सदस्यांनी या स्पर्धेत आपले क्रीडाकौशल्य दाखवत क्रिकेट खेळण्याचा मनमुराद आनंद लुटला.

# रायगडातील बौद्ध लेण्यांचा होणार विकास

## बुद्धिस्ट सर्किट पर्यटन मार्गात समावेश; मंत्री आदिती तटकरे यांच्याकडून पाहणी

**अलिबाग : प्रतिनिधी**

बौद्ध धर्माच्या अभ्यासकांसाठी राज्यात २५ पर्यटनस्थळे निवडण्यात आली आहेत. या अनुषंगाने बुद्धिस्ट सर्किट पर्यटन मार्ग तयार करण्यात येणार असून यामध्ये रायगड जिल्ह्याच्या तळा तालुक्यातील कुडा लेणी आणि महाड तालुक्यातील गांधारपाले या लेण्यांचा समावेश केला जाणार आहे. यामुळे त्यांच्या विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे.

या विकासात कुडा आणि गांधारपाले अशा दोन्ही ठिकाणी पर्यटनासंदर्भातील पायाभूत सुविधा निर्माण करण्याबरोबरच बौद्ध धर्माचा प्रचार होण्यासाठी आराखडा तयार केला जाणार आहे. **(पान २ वर..)**



### कोकणातील बौद्ध लेण्यांचे महत्त्व

भारतात स्थापन झालेल्या बौद्ध धर्माचा प्रसार एक हजार वर्षांपूर्वी जगभरात झाला. जगभरातील बौद्ध प्रचारक सागरी मार्गाने पुन्हा भारतात येताना मुंबईतील जोगेश्वरी लेणी, कुडा, गांधारपाले या लेण्यांमध्ये काही काळ विश्रांती करत आणि पुढील प्रवासाला सुरुवात करत. त्यामुळे या लेण्या बौद्ध धर्माच्या प्रसारात महत्त्वाच्या मानल्या जातात. या लेण्यांच्या परिसरात अनेक ऐतिहासिक घटना घडलेल्या असल्याने त्याचा शोध घेण्याचे कुतूहल इतिहास अभ्यासकांना आहे.

**“ महाराष्ट्रात अनेक बौद्धकालीन स्थळे आहेत. त्यांचा अभ्यास अद्याप पूर्ण झालेला नाही. पुरातत्व विभागाच्या वतीने तेथे संवर्धनाचे काम सुरू आहे. त्याच्या विकासासाठीही प्रयत्न केले जाणार आहेत. वेरूळ व अजिंठा लेण्यांना भेट व पर्यटनासाठी बौद्ध अभ्यासक मोठ्या संख्येने छत्रपती संभाजीनगरला येतात. यातील काही पर्यटक कोकणातील या स्थळांनाही भेट देत असतात. यातून येथील स्थानिकांना रोजगार उपलब्ध होणार आहे.**

**–आदिती तटकरे, मंत्री**

# क्रेडाईने एसटी महामंडळाची जमीन विकसित करण्यासाठी योगदान द्यावे -परिवहनमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

एसटी महामंडळाच्या १३६० हेक्टर जमिनीचा विकास करण्यासाठी क्रेडाई या संस्थेने आपले योगदान द्यावे, असे आवाहन परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी केले आहे. परिवहन मंत्री श्री. सरनाईक यांनी 'महाराष्ट्र चेंबर ऑफ हाऊसिंग इंडस्ट्रीज'ने आयोजित केलेल्या प्रदर्शनाला भेट दिली. त्या प्रसंगी मंत्री बोलत होते.

मंत्री सरनाईक म्हणाले की, एसटी महामंडळाचे राज्यभरात ८४२ ठिकाणी १३६० हेक्टर जमीन उपलब्ध आहे. या जागांचे शहरी, निम-शहरी आणि ग्रामीण असे वर्गीकरण करण्यात आले आहे. 'बांधा वापरा आणि हस्तांतरित करा' अथवा खाजगी सार्वजनिक भागीदारी तत्त्वावर या जमिनी विकसित करून तेथे एसटी महामंडळाला आवश्यक असलेली बसस्थानके, आगार आणि आस्थापना कार्यालय संबंधित विकासकाकडून बांधून घेण्यात यावीत.

त्याचबरोबर जिल्ह्याच्या ठिकाणी किमान १०० खाटांचे अद्ययावत रुग्णालय, इलेक्ट्रिक बस चार्जिंग स्टेशन, रेन वॉटर हार्वेस्टिंग आणि सोलर पॅनलसारखे पर्यावरण पूरक प्रकल्प उभारणे अपेक्षित आहे. या बदल्यात संबंधित विकासकाला त्या जमिनीवर त्याच्या सोयीनुसार व्यावसायिक क्षेत्र विकसित करता येईल.

यासंदर्भातील सर्वसमावेशक धोरण लवकरच एसटी महामंडळ आणणार असून यासाठी सूचना आणि प्रस्ताव क्रेडाई यासारख्या देशातील रिअल इस्टेट क्षेत्रातील नामवंत संस्थेने द्यावेत, असे आवाहनही क्रेडाई मंत्री सरनाईक यांनी केले. याप्रसंगी क्रेडाईचे अध्यक्ष डॉमनिक रोमेल व इतर पदाधिकारी, विकासक, वास्तुविशारद उपस्थित होते. एसटी महामंडळातर्फे वास्तुविशारद निलेश लहिवाल यांनी महामंडळाचे सादरीकरण केले.



## भाजप माणगाव तालुका उपाध्यक्षपदी राजू मुंढे

**माणगाव : प्रतिनिधी**

सामाजिक कार्यकर्ते व भाजपचे निष्ठावंत राजू मुंढे यांची भाजपा माणगाव तालुका उपाध्यपदी नियुक्ती झाली आहे. सदर पदाचे नियुक्ती पत्र भाजपा माणगाव तालुका अध्यक्ष गोविंद कासार यांनी नुकतीच शासकीय विश्रामगृह येथे पक्षाच्या बैठकीत नियुक्ती पत्र देवून नियुक्ती केली.

या वेळी जिल्हा उपाध्यक्ष नाना महाले, सहकार सेलचे जिल्हाध्यक्ष संजय पंदेरे, भाजप नेते चिन्मय मोने, जिल्हा सदस्य संजयआप्पा ढवळे, जिल्हा सरचिटणीस उमेश साटम, सरचिटणीस बाबुराव चव्हाण, योगेश पालकर, जहेंद्र मुंढे, उपाध्यक्ष अरुण पेणकर, ॲड. नितीन आंब्रे, राहुल धुपकर, नयन खेडेकर, निखील साळुंखे, रमेश ढेबे तसेच अनेक कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी नवनिर्वाचित उपाध्यक्ष राजू मुंढे बोलताना म्हणाले कि, पक्षाचे ध्येय धोरणे केंद्र व राज्य सरकारच्या विकास योजना ह्या जनतेपर्यंत पोचविण्यासाठी आपण प्रयत्न करू तसेच सर्वांना सोबत घेऊन आगामी काळात अधिक जोरात काम करू असा विश्वास दिला. यापूर्वी राजू मुंढे यांनी भाजपाचे शहराध्यक्ष पद भूषविले होते त्यामुळे संघटना बांधणीचे कौशल्य त्यांच्याकडे आहे.

राजू मुंढे यांची नियुक्ती झाल्याची माहिती समजताच उतेखोल वाडी ग्रामस्थ मंडळ व माणगाव मित्रपरिवारांने त्यांचे अभिनंदन केले आहे. खा. धैर्यशील पाटील,आ. प्रशांत ठाकूर, भाजप नेते सतीश धारप, माणगाव नगरसेवक राजेश मेथा, नितीन दसवते, शरद जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पक्ष वाढीसाठी अधिक प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

## कामोठ्यातील विद्यार्थ्यांसह पालकांचे प्रबोधन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कामोठे परिसरातील विद्यार्थी तसेच पालक यांना प्रबोधन करण्यासाठी १ जानेवारी २०२४ पासून दिशा व्यासपीठ व कामोठे पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विचाराने शाळा तसेच समाजातील विविध संस्था अशी ठिकाणे शोधून समाजात प्रबोधन करण्याचे कार्य करण्यात आले



सदर कार्यात कामोठे पोलीस अधिकारी,कर्मचारी तसेच वकील व जाणकार प्रतिष्ठित यांच्यामार्फत त्यांचे अनुभव या माध्यमातून भावी पिढीला मार्गदर्शन केले यामध्ये १) मोबाईलच्या विळख्यात अडकलेला विदयार्थीवर्ग, २) सायबर क्राईम सायबर फ्रॉड व्हाट्सअप फेसबुक द्वारे होणारे रोड व त्यामध्ये बरबाद होणारी तरुण पिढी ३) मुलींवरील अत्याचार व घ्यावयाची खबरदारी, यामध्ये शाळेतील मुलींना गुड टच व बॅड टच बाबत दिलेली माहिती ४)अमली पदार्थ विरोधी जनजागृतीचे अभियान इत्यादी विविध विषयावर प्रबोधन करण्यात आले

दिशा सामाजिक संस्था कामोठे पोलीस स्टेशनच्या सहकार्याने वर्षाच्या पहिल्या दिवसापासून हे अभियान शालेय विद्यार्थ्यांसाठी राबवत आहे. आतापर्यंत जवळपास चौदा शाळांमध्ये अशा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते सहा हजाराच्या आसपास विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले

सोशल मीडियाच्या वापराविषयी जागरूकता, मोबाइलचा सकारात्मक व नकारात्मक वापर व त्याचा मानसिक आरोग्यावर होणारा दुष्परिणाम व प्रभाव, ऑनलाईन फसवणूक सायबर सुरक्षा, सायबर गुन्हा व प्रकार, मानसिक आरोग्य जागरूकता अभियान, मुला-मुलींच्या सुरक्षेसाठी असणाऱ्या मार्गदर्शक सूचना तसेच शारीरिक बदलामुळे होणारे परिणाम, आणि अमली पदार्थ विरोधी जनजागृती तसेच सोशल मीडिया च्या गैरवापरामुळे सायबर गुन्हेगारी किंवा सायबर जागरूकता या विद्यार्थामध्ये कशी पसरवली जाऊ शकते, याबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक विमल बिडवे, व सहकार्यांनी मार्गदर्शन केले.

## आमदार महेंद्र थोरवे फाउंडेशनतर्फे खोपोलीत रायगड महोत्सव उत्साहात

**खोपोली : रामप्रहर वृत्त**

आमदार महेंद्र थोरवे फाउंडेशन आणि सहससेवा फाउंडेशनच्यावतीने खोपोलीतील जनता विद्यालय मैदानात १७ ते १९ जानेवारी दरम्यान रायगड महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला राज्याच कॅबिनेट मंत्री भरत शेठ गोगावले व आमदार महेंद्र थोरवे यांची विशेष उपस्थिती लाभली

या कार्यक्रमाचे आकर्षण ठरले ते वारकरी संप्रदायाचे रिंगण सोहळा. शेकडो वारकरी त्याचप्रमाणे हास्य क्लबचे सदस्य आणि नागरिकांनी या रिंगण सोहळ्यात भाग घेतला. यामध्ये महिलांची संख्या लक्षणीय होती. या रिंगण सोहळ्यामुळे पंढरपूरची आठवण सर्व वारकरी संप्रदायाला आणि खोपोलीकरांना झाली.

ज्येष्ठ कीर्तनकार रामदास महाराज पाटील यांच्या नेतृत्वाखाली रंगलेल्या या रिंगण सोहळ्यात हास्य क्लबचे संस्थापक बाबुभाई आणि त्यांच्या सुमारे २०० साधकांनी व नागरिकांनी भाग घेतला. महेंद्र थोरवे फाउंडेशन तर्फे आकर्षक बक्षीस योजनेची आयोजन करण्यात आले होते.



## माडप आदिवासीवाडीतील मयत महिलेचा नातूच निघाला खुनी!

**चौक : प्रतिनिधी**

नात्याला काळीमा फासणारी घटना खालापूर तालुक्यातील माडप आदिवासी वाडीत घडल्याने खळबळ उडाली आहे, गुंजभर सोन्यासाठी नातवाने आजीचा खून केला.खालापूर पोलिसांच्या अथक प्रयत्नांनी अखेर आरोपी सापडला.

राधाबाई धर्मा कातकरी वय वर्ष अंदाजे ५५ या खालापूर तालुक्यातील माडप गावच्या आदिवासी वाडीतील महिलेचा खून झाला होता.पोलिस तपास यंत्रणा कामाला लागली, पण संशय कुणावर घेता येत नव्हता. प्राथमिक चौकशीत राधाबाई यांच्या गळ्यात सोन्याची चेन होती,असे समजले,त्यावर पोलिसांनी चौक व रसायनी येथील सोन्याच्या दुकानात शोध सूरू केला असता, चौक येथील एका सोन्याच्या पेढी वर एकजण विकण्यास आला होता, पण अधिकृत पावती नसल्याने ते विकले गेले नाही. पेढी वर असलेल्या सीसीटिव्ही कॅमेरात तो कैद झाला होता.तपासा अंती तो मयत राधाबाई यांचा नातू सुमित काशिनाथ कातकरी असल्याचे समजल्यावर तात्काळ त्याला ताब्यात घेण्यात आल्यावर त्याने गुन्ह्याची कबुली दिली.

आजीची हत्त्या केल्यावर त्याने पलायन केले. हत्या झाल्याचे समजल्यावर तो घरी आल्याचे नाटक करून आजीच्या अंतिम यात्रेत सामील होता, त्यामुळे त्याच्यावर संशय येत नव्हता. पण पोलिसांच्या चाणाक्ष नजरेतून सीसीटिव्ही कॅमेरात कैद झाल्याने आरोपी सापडला.विभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार करीत आहेत

### राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा

## अभय आळशी, आदिती वाटवे विजेते

**धाटाव, रोहा : प्रतिनिधी**

स्व. डॉ.सी.डी. देशमुख यांच्या जयंतीनिमित्ताने झालेल्या राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेत वरिष्ठ महाविद्यालय गटात मुलुंडच्या वझे महाविद्यालयाचा अभय कृष्णकांत आळशी आणि कनिष्ठ महाविद्यालय गटात कोएसो मेहेंदळे हायस्कूल रोह्याची आदिती अनिल वाटवे विजेते ठरले. राज्यभरातील वेगवेगळ्या महाविद्यालयातील सुमारे ५०हून अधिक स्पर्धक या स्पर्धेत सहभागी झाले होते.

१०० वर्षांची परंपरा असलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव ट्रस्ट रोहा व कोएसो डॉ.सी.डी. देशमुख वाणिज्य व सौ.के.जी. ताम्हाणे कला महाविद्यालय रोहा यांच्या विद्यमाने रोह्याचे सुपुत्र स्व. चिंतामणराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त गेली ३१ वर्षे ही स्पर्धा रोहा येथे होत आहे. स्पर्धेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. अतुल साळुंके, अ.भा. मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष मिलिंद अष्टिवकर, सार्वजनिक गणेशोत्सव ट्रस्टचे अध्यक्ष चंद्रकांत पार्टे, माजी अध्यक्ष अमित उकडे, रोहा प्रेस क्लब अध्यक्ष सुहास खारिवले, सुराज्य संस्थेचे अध्यक्ष रोशन चाफेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

स्पर्धेत वरिष्ठ महाविद्यालय गटात केतन दिनेश गुप्ता (शेठ जे.एन.पालीवाला महाविद्यालय, पाली) द्वितीय आणि तृतीय क्रमांक पंकज पंढरीनाथ पांडुळे (महात्मा फुले महाविद्यालय, पनवेल) याने प्राप्त केला. कनिष्ठ महाविद्यालयीन गटात दीक्षांत दिनेश घाग द्वितीय (कोएसो मेहेंदळे हायस्कूल, रोहा) आणि तृतीय क्रमांक कस्तुरी रोहिदास शेडगे (कोलाड हायस्कूल, रोहा) याने मिळवला. वरिष्ठ महाविद्यालयीन गट फिरत्या चषकावर आनंदीबाई प्रधान महाविद्यालय नागोठणे व कनिष्ठ महाविद्यालयीन गट फिरत्या चषकावर कोएसो मेहेंदळे हायस्कूल रोहा यांनी नाव कोरले.

बक्षीस वितरण भाटे सार्वजनिक वाचनालयाचे माजी अध्यक्ष बापू जोशी, गणेशोत्सव ट्रस्टचे अध्यक्ष चंद्रकांत पार्टे, प्राचार्य डॉ. अतुल साळुंके, प्रा.टी. पी. मोकल आदींच्या हस्ते झाले. स्पर्धेचे परीक्षण डॉ. अंजली पुराणिक व भरत चौधरी यांनी केले. स्पर्धा प्रमुख म्हणून डॉ. सम्राट जाधव यांनी काम पाहिले. सार्वजनिक गणेशोत्सव ट्रस्टचे अमेय जोशी, सोहम बारटके, प्रसाद भालेकर, भारत वाकचौरे, हर्षद भाटे, वैभव कुलकर्णी आदी पदाधिकाऱ्यांसह कॉलेजचे गुरुजन व कर्मचारी आदींनी स्पर्धेसाठी परिश्रम घेतले.

## सखी मंचने महिला सक्षमीकरणाचे फुंकले रणशिंग

**माणगाव : प्रतिनिधी**

विशानेमा ज्ञाती मंडळाच्या सखी मंचाने दि. १९ जानेवारी रोजी माणगाव तालुक्यातील कडापे येथे आयोजित केलेल्या राज्यव्यापी महिला मेळाव्यात महिलांना त्यांच्या पायावर भक्कम उभे करणे आणि त्याचबरोबर स्वतःचं कुटुंब आणि समाजालाही एकत्र करून भावी आयुष्याची वाटचाल करणे, त्याचबरोबर समाजात बदल करण्यासाठी महिला सक्षमीकरणाचे रणसिंग फुंकले आहे.


विशानेमा ज्ञाती मंडळाच्या सखी मंचाने समाजातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणि सामाजिक-जाणिवा जागृत करण्यासाठी घेतलेला पुढाकार घेउन सखी मंचाची स्थापना के ली,तेव्हा उद्दिष्ट एकच होतं. महिलांना एकत्र आणणे, त्यांच्या मनातील कणखरतेला एक मंच देणे,आणि त्यांना कौटुंबिक तसेच सामाजिक क्षेत्रात मजबूत करणे हे आहे.

माणगाव तालुक्यातील कडापे येथे राज्यभरातून आलेल्या हजारो महिलांनी माणगाव तालुक्यातील कडापे येथे श्री.बापूजी बुवा काळकाई देवस्थान येथे नतमस्तक होत. सभागृहात आयोजित केलेल्या राज्यव्यापी महिला मेळाव्यात निर्धार व्यक्त करीत सक्षमीकरणासाठी रणसिंग फुंकले आहे.

रविवारी गुजराती समाज विशानेमा ज्ञाती मंडळाच्या सखी राज्यव्यापी महिला मंचाने महिला मेळावा आयोजित केला होता. कोकण विशानेमा ज्ञाती मंडळाचे अध्यक्ष प्रदीप गांधी यांनी मार्गदर्शन केले. या मंडळाचे विश्वस्त विजय मेहता यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले होते. या मेळाव्याला राज्यभरातून आलेल्या हजारो महिलांनी प्रत्यक्ष उपस्थितीत राहुन तर २००० पेक्षा अधिक महिलांनी ऑनलाइन द्वारे या मेळाव्याचा आनंद घेतला.

या मेळाव्याचे उद्घाटन सखी मंचच्या अध्यक्षा उर्मिला गुजर, यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी प्रमुख पाहुण्या शैलजा आपटे, सामाजिक कार्यकर्त्या निकिता शेठ, जयश्री गुजर, भावना गांधी, महाड को-ऑपरेटिव्ह बँकेच्या सदस्या नीता शेठ, नीलम मेथा, ज्योती खेमचंद मेहता, रंजना मेहता, नीलम मेहता, पूजा मेहता, जयश्री मेहता, सुनंदा शेठ, यासह मुंबई, ठाणे, पुणे, सातारा, सांगली, यासह राज्यभरातून आलेल्या अनेक महिला प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. दिवसभर चाललेल्या कार्यक्रमात विविध महिला मान्यवरांनी मार्गदर्शन केले.


या महिला मेळाव्यात शैलजा आपटे यांनी अन्नातील विविध पदार्थ दूध, मध, हळद, कॉफी, साखर या सह भेसळ कशी ओळखायची याबाबतचे प्रात्यक्षिक दाखवत मार्गदर्शन केले. विशानेमा ज्ञाती सखी मंचने युट्यूब उपलब्ध करून दिले असून त्यातून तुम्हाला घर बसल्या माहिती आता मिळणार आहे. या युट्युबचा वापर महिलांनी केल्यास अधिक महिला सक्षम होतील असा विश्वास ही त्यांनी दिला.




## खो-खो विजेतेपद संघाचा कर्णधार प्रतीकचे महावितरणकडून अभिनंदन

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

महावितरणच्या पुणे परिमंडलातील पर्वती विभागमध्ये कार्यरत प्रतीक वाईकर यांच्या नेतृत्वात भारतीय खो-खो संघाने पहिल्या विश्वचषकाचे विजेते होण्याचा मान पटकावला आहे. तब्बल २० देशांचा सहभाग असलेल्या या विश्वस्पर्धेत भारतीय संघाचा कर्णधार व उत्कृष्ट खेळाडू म्हणून प्रतीक वाईकर यांनी मोलाची कामगिरी केली. विजेत्या संघासह प्रतिक वाईकर यांच्यावर देशभरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.



महावितरणचे खेळाडू म्हणून विश्वचषक विजेत्या संघाचे नेतृत्व करणाऱ्या प्रतीक वाईकर यांचे राज्याचे मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, संचालक (संचालन / मानव संसाधन) अरविंद भादिकर, पुणे प्रादेशिक संचालक भुजंग खंदारे, पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता राजेंद्र पवार यांनी अभिनंदन केले आहे.

महाराष्ट्र शासनाचा श्री शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारप्राप्त असलेले प्रतीक वाईकर यांनी महाराष्ट्र संघाच्या १४ वर्षाखालील, १६ वर्षाखालील व १८ वर्षाखालील वयोगटाचे व वरिष्ठ गटाचे नेतृत्व केले आहे.


पान १ वरून

## रायगडातील बौद्ध लेण्यांचा होणार विकास

महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे यांनी केंद्रीय पुरातत्व विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत कुडा लेणीची पाहणी केली. ऑगस्ट २०२१मध्ये कुडा आणि गांधारपाले लेण्यांचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे मांडण्यात आला होता. त्या वेळेही ना. तटकरे यांनी अधिकाऱ्यांसमवेत या लेण्यांची पाहणी करत विकासकामांचा आराखडा मांडण्याच्या सूचना केल्या होत्या.

राज्यातील २५ बौद्ध धर्मियांच्या स्थळांचा बुद्धिस्ट सर्किट अंतर्गत समावेश करण्यात आला असून यासाठी प्रत्येकी १० कोटी निधी मिळणार आहे. यात बौद्ध धर्मियांच्या इतिहास अभ्यासाला प्रोत्साहन देणे, देश-विदेशातील पर्यटकांना या स्थळांच्या अभ्यासासाठी आमंत्रित करणे आणि या स्थळांचा जास्तीत जास्त पर्यटनासाठी प्रचार करण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

## भरडखोल शाळेचा क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत प्रथम क्रमांक



**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यात १५ आणि १६ जानेवारी २०२५ रोजी पारंपारिक नृत्य आणि देशभक्तीपर समूह गीत गायन स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धांमध्ये पीएमश्री रायगड जिल्हा परिषद मराठी शाळा, भरडखोलने मोठ्या यशाची नोंद केली. शाळेने तालुकास्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त करून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी आपले स्थान पक्के केले. भरडखोल शाळेच्या विद्यार्थ्यांनी. पारंपारिक नृत्य आणि समूह गीत गायनातील त्यांच्या सुरेख सादरीकरण केले. शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे या स्पर्धेत त्यांना अप्रतिम यश प्राप्त झाले.

# चिरनेर येथील बर्ड फ्लू नियंत्रणात आणण्यासाठी जिल्हा प्रशासन प्रयत्नशील

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यात चिरनेर येथे एका कुक्कुटपालकाच्या कोंबड्या बाधित होऊन मृत पावल्याची घटना काही दिवसापूर्वी घडली आहे. या कोंबड्या बर्ड फ्लू बाधित होऊन दगावल्याचे स्पष्ट झाले आहे. हा रोग संसर्गजन्य असल्यामुळे या रोगाचा प्रसार जिल्ह्यात इतर ठिकाणी होण्याची शक्यता नाकारता येत नाही .याकरिता बर्ड पल्यू रोग प्रतिबंध करणे व रोग प्रसार रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजना म्हणून प्राण्यांमधील संक्रामक व संसर्गिक रोग प्रतिबंधक उपाययोजना करणे यासाठी जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली चिरनेर येथे रविवार (दि. १९) काम सुरू आहे.

जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी चिरनेर येथील कुक्कुटपालक शेतकरी यांना बाधित क्षेत्रातील मृत आजारी निरोगी दिसणारे पाळीव पक्षी त्याचप्रमाणे गिनी, टर्की बदकचे मार्क्स, अंडी, तूस, भुसा इत्यादी महसूल अधिकारी यांच्या उपस्थितीत पंचनामा करून, पक्षी मानवतापूर्वक व शास्त्रोक्त पद्धतीने नष्ट करावे. रोगाचे जलद नियंत्रण करणे व संक्रमण रोखण्यासाठी सदरची कारवाई जलद गतीने व जैव सुरक्षित असावी .हे सर्व महसूल अधिकारी यांच्या उपस्थितीत नष्ट करण्याचे आदेश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले आहेत.



त्याचप्रमाणे बाधित ठिकाणी वाहनांची येजा करण्यास सक्त मनाई करण्यात आली असून खाजगी वाहनेदेखील बाधित ठिकाणाच्या बाहेर ५०० मीटर अंतरावर लावण्यात यावी अशाही सूचना देखील जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या आहेत. त्याचप्रमाणे बाधित क्षेत्रात जिवंत व कुक्कुट पक्षी, अंडी, पशुखाद्य, विष्ठा अशा प्रकारच्या साहित्याच्या वाहतुकीस ९ फेब्रुवारी पर्यत बंदी घालण्यात आली आहे. त्याचप्रमाणे ९ फेब्रुवारी पर्यत कोंबड्यांची खरेदी विक्री, बाजार यावर जिल्हा प्रशासनाने बंदी घातली आहे. चिरनेर येथील महेंद्र मोकल यांच्या पोल्ट्रीतील ३०५ कोंबड्या अंडी, पोल्ट्रीत वापरण्यात आलेला तूस नष्ट करण्यात आला आहे तसेच या परिसरातील कुकूटपालन करणाऱ्यांच्या कोंबड्या नष्ट करण्याचे काम रविवारी रात्री करण्या उशिरा पर्यंत सुरू होते. जवळजवळ पंधराशे ते दोन हजाराच्या आसपास कोंबड्या नष्ट करण्यात आल्याचे समजते.

चिरनेर गावात महिंद्र मोकल या शेतकऱ्यांच्या जवळपास ३०५ कोंबड्या मारल्या गेल्या आहेत. चिरनेर येथील एका पोल्ट्री फार्ममध्ये कोंबड्यांना बर्ड फ्लूची लागण झाल्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर चिरनेर गावातील पोल्ट्री फार्म तसेच ज्या ज्या घरात कुक्कुटपालन आहे. त्या ठिकाणच्या कोंबड्या नष्ट करण्यात आल्या. मात्र कोंबड्या नष्ट केल्यामुळे छोट्या कुकूटपालकांचे व पोल्ट्री मालकांच्या नुकसान झाले आहे.



आम्हाला योग्य ती नुकसानभरपाई मिळेल का असा सवाल पोल्ट्री मालक महेंद्र मोकल यांनी जिल्हा प्रशासनाला केला आहे.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात सामूहिक वाचन कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मुंबई विद्यापीठांतर्गत ग्रंथालयातर्फे सामूहिक वाचन या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षक यांनी सामूहिक गटाने एकत्रित येऊन ग्रंथालयामध्ये वेगवेगळ्या ग्रंथांचे वाचन केले पाहिजे हा होता.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून ग्रंथालयामध्ये वेगवेगळे विषयाचे मासिके, वेगवेगळ्या विषयांची पुस्तके, संदर्भ ग्रंथ यांचे वाचन विद्यार्थी व प्राध्यापकांनी केले. या कार्यक्रमामुळे महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी वेगवेगळी पुस्तके सामूहिक गटाने पुस्तक वाचण्यासाठी प्रेरणा मिळाली.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. महेश्वरी झिरपे यांनी या उपक्रमाचे आयोजन केल्याबद्दल ग्रंथालय समितीचे अभिनंदन केले व पुढील उपक्रमासाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. पूजा लांजेकर यांनी केले तसेच वैभव झगडे, ग्रंथालय समितीतील इतर सर्व सदस्य शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.



# महापालिकेच्या विभाग प्रमुखांना जलदगतीने कामे करण्याच्या सूचना

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका कार्यक्षेत्रात सुरू असलेल्या विविध विकासकामांचा विभागवार आढावा सोमवार (दि. २०) रोजी मुख्यालयात झालेल्या बैठकीत प्रशासक तथा आयुक्त मंगेश चितळे यांनी घेतला. यावेळी विकास कामे जलद गतीने पूर्ण करण्याच्या सूचना आयुक्तांनी संबधित विभागास दिल्या.

या वेळी उपायुक्त कैलास गावडे, बाबासाहेब राजळे, डॉ. वैभव विधाते, रविकिरण घोडके, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे, शहर अभियंता संजय कटेकर, मुख्य लेखा परीक्षक निलेश नलावडे, लेखा अधिकारी संग्राम व्हारेकाटे, उपमुख्य लेखा परीक्षक संदीप खुरपे, उपअभियंता विलास चव्हाण, सहाय्यक अधिकारी स्वरूप खारगे, सहाय्यक आयुक्त स्मिता काळे, डॉ.रूपाली माने, सुबोध ठाणेकर, श्रीराम पवार, शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण, सर्व विभाग प्रमुख, अधिकारी उपस्थित होते.

या वेळी पालिका हद्दीतील मृतदेह ठेवण्यासाठी शीतगृह उभारण्याबाबत अंदाजपत्रक तयार करणे.महापालिका



हद्दीतील सर्व स्मशानभूमी अत्याधुनिक करणेस्तव नियोजन करणेबाबत बांधकाम विभागस सूचित करण्यात आलेत. याबरोबरच तीन ठिकाणी शाळा बांधणेस्तव अंदाजपत्र तयार करणे, पार्किंग स्थळे व वाहनांची क्षमता लक्षात घेऊन शुल्क आकारणीबाबत पॉलिसी तयार करणे अशा विविध बांधकाम विभागाशी संबधित कामाचा यावेळी आढावा घेण्यात आला.

स्काय वॉकवर सोलर पॅनल बसविणे व महापालिका हद्दीत कोठेही वीज चोरी होत नाही याबाबतचा अहवाल सादर करण्याबाबत विद्युत विभागस आयुक्तांनी सूचित केले. अल्पसंख्यांक समाजासाठी विविध ठिकाणी दफनभूमी तयार करणेस्तव जागा निश्चित करणे.आदिवासी बांधवांना राहण्यासाठी जागा उपलब्ध करणे.आसुडगाव प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत भूखंडाबाबत पाठपुरावा करणेबाबत नगर रचना विभागास आयुक्तांनी सूचित केले.

महापालिका हद्दीत सार्वजनिक ठिकाणी शौचालय उभारणेस्तव नियोजन करणे, कळंबोली स्टील मार्केट येथे अत्याधुनिक शौचालय उभारणेस्तव नियोजन करण्याबाबत आरोग्य विभागास आयुक्तांनी सूचित केले.तसेच पनवेल महानगरपालिका हद्दीमध्ये धुळप्रदुषण करिता एअर मॉनिटर बसविणेबाबत कामाचा आढावा आयुक्तांनी घेतला.

पनवेल महानगरपालिका हद्दीत अनधिकृत आठवडा बाजार बसू नये याची खबरदारी घेण्याबाबत आयुक्तांनी संबधित अधिकाऱ्यांना सूचित केले. फेरीवाला व्यवसाय धारकाची नोंदणी व त्यांना परवाना देणेबाबत संबधित विभागास सूचित करण्यात आले. सर्व प्रभाग अधिकाऱ्यांनी अनधिकृत होर्डिंग्स, फ्लेक्स, बॅनरवरती तात्काळ कारवाई करण्यात यावी तसेच त्यांना नोटीस देऊन त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याचे आदेश आयुक्तांनी या वेळी प्रभाग अधिकाऱ्यांना दिले.

नगरपरिषद प्रशासन संचालनालय अंतर्गत कोकण विभागास्तरीय स्पर्धामध्ये पनवेल महानगरपालिकेने मिळवलेल्या यशाबद्दल संबधित अधिकाऱ्यांचे आयुक्तांनी कौतुक केले.

# उरण चारफाटा येथील अनधिकृत बांधकामांवर सिडकोचा हातोडा





**उरण : प्रतिनिधी**

सिडकोने २० जानेवारी रोजी उरण चारफाटा येथील अनधिकृत बांधकामे आणि फेरीवाले यांच्यावर जेसीबी मशीनचा हातोडा फिरवून कारवाई करण्यात आली. यावेळी मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

चारफाटा हा उरण शहर,पिरवाडी, करंजा येथील प्रवेशद्वार आहे. या मार्गावरील अनधिकृत फेरीवाले आणि टपऱ्या यांनी येथील पदपथ आणि निम्मे मार्गही काबीज केल्याने या परिसरात दररोज प्रचंड वाहतूक कोंडीचा सामना नागरिकांना करावा लागत आहे. रविवारी तर पायी चालणारे आणि वाहनचालक यांना त्रास सहन करावा लागत असल्याने नागरिकांनी या फेरीवाल्यांवर कारवाई करण्याची मागणी केली होती. त्यानुसार ही कारवाई करण्यात आली आहे.

सिडकोने पायी चालणाऱ्यांसाठी पदपथ तयार केले आहेत. परंतु पदपथावरील अनाधिकृत बांधकामे आणि फेरीवाले यांच्यावर मागील १५ वर्षांपासून कारवाई केली जात आहे आणि आश्चर्याची बाब म्हणजे फेरीवाले त्याच ठिकाणी बस्तान मांडतात.फेरीवाले सिडको प्रशासन, पोलिस यांना जुमानत नाहीत अशी प्रतिक्रिया ना–गरिकांनी व्यक्त केली आहे.

# संजय भोपी प्रीमियर लीग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खांदा कॉलनीमध्ये संजय भोपी प्रीमियर लीग या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आणि पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत शुभेच्छा दिल्या.



आनंदी ग्रुप, संजय भोपी सोशल क्लब, अॅलर्ट सिटीझन फोरम, मॉर्निग योगा ग्रुप आणि खादा कॉलनी बॅडमिंटन क्लबतर्फे ४० वर्षावरील खेळाडूंसाठी रविवारी संजय भोपी प्रीमियर लीग या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन खांदा कॉलनीमधील महात्मा स्कूलच्या मैदानात आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेला आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत उत्कृष्ट आयोजनाबद्दल आयोजकांचे कौतुक केले. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी,



पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, अमरीश मोकल, भीमराव पोवार, मोतीलाल कोळी, अभिषेक भोपी आदी मान्यवर उपस्थित होते.

# पनवेल तालुका पत्रकार प्रेस क्लब अध्यक्षपदी प्रशांत शेडगे



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल गेस्ट हाऊस येथे रायगड जिल्हा प्रेस क्लबच्या अंतर्गत पनवेल तालुका पत्रकार प्रेस क्लबची कार्यकारणी जाहीर करण्यात आली असून अध्यक्षपदी पत्रकार प्रशांत शेडगे यांची एकमताने निवड करण्यात आली.

मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त एस.एम. देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली परिषदेचे अध्यक्ष मिलिंद आष्टीकर आणि रायगड प्रेस क्लबचे अध्यक्ष मनोज खांबे व विजय मोकल तसेच अनिल भोळे यांच्या उपस्थितीत पनवेल तालुका पत्रकार प्रेस क्लबची स्थापना करण्यात आली. उपाध्यक्षपदी तृप्ती पालकर, सरचिटणीस हरेश साठे, कार्याध्यक्ष राजेंद्र पाटील, खजिनदार म्हणून दत्तात्रय कुलकर्णी आणि सल्लागारपदी नितीन देशमुख यांची निवड करण्यात आली.

ज्येष्ठ पत्रकार गणेश कोळी, संजय कदम, सुमन नलावडे, नितीन कोळी, रायगड प्रेस क्लबचे विश्वस्त मोकल आणि भोळे उपस्थित होते. या वेळी पनवेल तालुका पत्रकार प्रेस क्लबचे अध्यक्ष यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की पत्रकार संघटनेच्या माध्यमातून सातत्याने सामाजिक उपक्रम राबवून समाजामध्ये आदर्श निर्माण करू तसेच जास्तीत जास्त तळागाळातील घटकांपर्यंत पोहचून गरजवंतांना मदतीचा हात देऊ. पनवेल शहर जुने भाजी मार्केट व्यापारी संघटनेचे अध्यक्ष कमलाकर मुंडकर, उपाध्यक्ष सोमनाथ इचके यांच्यासह व्यापाऱ्यांनी शेडगे यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## कळंबोली येथे संत वामनभाऊ, भगवानबाबा जयंतीनिमित्त नामसप्ताह

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

येथील सेक्टर ४मध्ये श्री स्वामी समर्थ मंदिर येथे श्री संत वामनभाऊ व श्री संत भगवान बाबा यांच्या संयुक्त पुण्यतिथीनिमित्त तीन दिवसीय अखंड नाम संकीर्तन सोहळा होणार आहे.

या सोहळ्यामध्ये सोमवार दिनांक २० जानेवारी रोजी दुपारी ४ ते ६ वाजता पालखी प्रदक्षिणा झाली. यात भाविक सहभागी झाले होते. संध्याकाळी हभप भागवत भास्कर रोहिदास महाराज गर्जे यांचे कीर्तन नियोजित होते. मंगळवार दि. २१ रोजी आदिनाथमहाराज डोळे यांचे कीर्तन होणार आहे तसेच बुधवार दि. २२ सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत हभप महंत रामकृष्ण महाराज शास्त्री मठाधिपती श्री क्षेत्र विठ्ठलगड यांचे सुश्राव्य असे काल्याचे किर्तन होणार आहे.

या सोहळ्यासाठी प्रमुख उपस्थिती पनवेलचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर हे उपस्थित राहणार आहेत

या सोहळ्याचा सर्वांनी आनंद घ्यावा व या कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन मंडळाचे पदाधिकारी सर्वश्री बबन बारगजे, माजी नगरसेवक बबन मुकादम, आजिनाथ जायभाये, विजय गर्जे, श्रीकृष्णा गर्जे यांनी केले आहे.






**पनवेल : १९ वर्षाखालील मुलांसाठी लेदर क्रिकेट स्पर्धा खारघर येथे आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत कुणाल पाटील यांच्या संघाने विजेतेपद पटकाविले. विजेत्या संघाला भाजप युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हा कार्यकारिणी सदस्य फुलाजी ठाकूर, मुंबईतील प्रशिक्षक तेंडुलकर, युवा मोर्चा जिल्हा सचिव शुभ पाटील, सुजित मनोहर, आदित्य मंधारे यांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरविण्यात आले.**

## संपादकीय

# साखर उद्योगाला दिलासा

साखरेच्या निर्यातीला मंजुरी देण्याची मागणी काही संघटनांनी केंद्र सरकारकडे लावून धरल्यानंतर अवघी परिस्थिती विचारात घेऊन केंद्र सरकारने दहा लाख टन साखर निर्यातीला परवानगी दिली आहे. या निर्णयामुळे साखर उद्योगाला दिलासा मिळणार असून देशांतर्गत साखरेच्या किंमतीच्या व्यवस्थापनात मदत होईल.

**साखर उद्योगावर केंद्र सरकारच्या निर्यातविषयक धोरणाचा खोलवर प्रभाव पडतो हे सर्वज्ञातच आहे. साखरेचा देशांतर्गत पुरवठा आणि मागणी संतुलित करण्यासाठी, किंमती स्थिर करण्यासाठी तसेच ऊसउत्पादक शेतकरी, साखर कारखानदार आणि ग्राहकांसह लाखो भागधारकांना या धोरणातून आधार मिळत असतो. त्यामुळे अवघ्या परिस्थितीचा साकल्याने विचार करूनच केंद्र सरकारने यंदाच्या साखर हंगामात दहा लाख टन साखर निर्यातीला परवानगी दिली आहे. तसेच इथेनॉल निर्मितीसाठी अन्न महामंडळाकडे असलेला प्रति किलो २८ रूपये दराचा २४ लाख टन तांदूळ प्रति किलो २२.५० रूपये दराने देण्याचा निर्णयही घेतला. स्वाभाविकपणे या निर्णयामुळे साखर उद्योगाला मोठा दिलासा मिळाला आहे. चालू हंगामात देशांतर्गत वापरासाठी साखरेचा पुरेसा साठा आणि इथेनॉल ब्लेडिंग प्रोग्राम सुरळीत ठेवण्यावर कोणताही प्रतिकूल परिणाम या निर्णयामुळे होणार नाही. उलट साखर कारखान्यांची आर्थिक तरलता राखण्यात मदत होऊन शेतकऱ्यांची ऊसाची बिले वेळेवर अदा करण्यात मदतच होईल. दहा लाख टन साखरेचा स्टॉक कमी झाल्याने देशांतर्गत साखरेचे दर वाढतील असा अंदाज आहे. घरगुती वापरासाठी पुरेशी साखर उपलब्ध असल्याची खात्री हा निर्णय घेताना सर्वोच्च प्राथमिकतेने करावी लागते. यामुळे देशांतर्गत बाजारात किंमती स्थिर राहण्यास मदत होते. राज्य साखर संघ, वेस्टर्न महाराष्ट्र शुगर मिल असोसिएशन (विस्मा), 'इस्मा' व राष्ट्रीय साखर संघाने चालू हंगामात साखरेच्या निर्यातीला परवानगी देण्याबाबत केंद्र सरकारला विनंती केली होती. मागील वर्षीचा साठा, चालू वर्षाचे नवीन उत्पादन व देशातील साखरेचा खप याची आकडेवारी सरकारसमोर ठेवून, आपण कमीत कमी १० लाख टन साखर निर्यात करू शकतो, अशी मागणी या संघटनांनी केली होती. या आकडेवारीचा विचार करूनच केंद्र सरकारने हा निर्णय घेतला आहे. याआधीच्या हंगामात साखर निर्यातीला परवानगी केंद्र सरकारने दिली नव्हती. पण या संघटनांनी परिस्थिती सुयोग्य पद्धतीने सरकारसमोर ठेवून पाठपुरावा केल्यामुळे केंद्र सरकारने आता निर्यातीचा निर्णय घेतला आहे. जागतिक साखरेच्या किंमतीच्या अस्थिरतेपासून स्थानिक शेतकऱ्यांचे संरक्षण करतानाच देशांतर्गत उद्योग स्पर्धात्मक राहतील याकडेही सरकारला लक्ष द्यावे लागते. उत्पादक आणि ग्राहक या दोघांनाही फायदा देणारा स्थिर आणि स्पर्धात्मक साखर उद्योग निर्माण करण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे. अनेक देश त्यांच्या साखर उद्योगांना सबसिडी देतात, ज्यामुळे भारतीय साखरेला आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धा करणे आव्हानात्मक बनू शकते. भारत हा जगातील क्रमांक दोनचा साखरउत्पादक देश गणला जातो. निर्यातमंजुरीच्या या निर्णयानंतर आता कारखानानिहाय निर्यात कोटा किती आणि कसा जाहीर होतो याकडे साखर उद्योगाचे लक्ष लागले आहे. भारत साखरनिर्यातीत उतरल्यानंतर त्याचा आंतरराष्ट्रीय बाजारातील दरावर थोडाफार परिणाम होण्याची शक्यता आहे. शुक्रवारी बाजार बंद होताना साखरेचा प्रति टन दर ४१ हजार ४३७ होता. यातून सर्वसाधारणपणे बंदरापर्यंत साखर वाहतुकीचा प्रति टन तीन हजार रूपये खर्च वजा जाता कारखान्यांना निर्यातीतून प्रति टन ३८ हजार ४३७ रूपये मिळतील अशी अपेक्षा आहे.**

# चित्रपट दिग्दर्शक, कवी व लेखक शांताराम आठवले

शांताराम आठवले हे मराठी चित्रपटदिग्दर्शक, लेखक, गीतकार होते. त्यांचा आज स्मृतीदिन आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया या लेखातून त्यांच्याविषयी...



शांताराम गोविंद आठवले यांचे वडील सरदार शितोळे यांच्या पुण्याकडील जहागिरीची व्यवस्था पाहत असत. कसबा पेठेतील त्यांच्या वाड्यातच शांताराम यांचे बालपण गेले. त्यांच्या वडिलांना नाटकाचा व गाण्याचा शौक होता. शितोळे यांच्या वाड्यातील दिवाणखान्यात तमाशाचे फड कडकडत, बैठकी रंगत, शाहिरांच्या हजेऱ्या लागत. हे सारे शांताराम आठवले यांना लहानपणीच पाहायला मिळाले. तो काळ मराठी नाटकाच्या वैभवाचा काळ होता. त्यांनी बहुतेक सारी चांगली नाटके पाहिली. त्यातूनच त्यांचा कलावंताचा पिंड हळूहळू घडत गेला.

भावे स्कूलमधील शिक्षकांनी शांताराम यांची कलात्मक अभिरुची अधिक डोळस केली. याच शाळेत त्यांना कविवर्य माधव ज्युलियन यांच्या अध्यापनाचा लाभ घडला, पण आठवले यांची काव्यवृत्ती खरी फुलवली ती प्रा. वा. भा. पाठक यांनी. मराठीसोबतच प्रा. किंकर यांनी इंग्रजी काव्याचीही त्यांना गोडी लावली. त्यांनीच शांताराम आठवले यांच्या कविता प्रथम प्रकाशात आणल्या.

शांताराम १९३० साली मॅट्रिक झाले. कौटुंबिक अडचणींमुळे त्यांनी पहिल्या वर्षातच महाविद्यालय सोडले. प्रसिद्ध लेखक ना. ह. आपटे यांचे 'पहाटेपूर्वीचा काळोख' हे पुस्तक त्यांच्या वाचनात आले. त्याने प्रभावित होऊन शांताराम त्यांना भेटायला कोरेगावला गेले, तेथे त्यांच्या सहवासात काही काळ राहिले.

याच सुमारास 'प्रभात फिल्म कंपनी' कोल्हापूरहून पुण्यास आली होती व ना. ह. आपटे यांच्या कथेवरून 'अमृतमंथन' हा चित्रपट काढायची बोलणी सुरू होती. आपटे यांनी शांताराम आठवले यांचे साहित्यगुण पारखले होते. त्यांनीच शांतारामबापूंकडे आठवल्यांच्या नावाची शिफारस केली. आपटे यांच्याच प्रेरणेने आठवल्यांनी 'प्रभात'मध्ये पदार्पण केले. प्रभातमध्ये तीस रुपये पगारावर पद्यलेखक म्हणून त्यांची नेमणूक झाली. सुरूवातीला पद्यलेखनाबरोबरच चित्रीकरणास साहाय्यक म्हणून पडणारी सर्व कामे ते करत असत. शिवाय प्रभातच्या प्रसिद्धीचे व त्यानिमित्त करावे लागणारे सर्व लेखन करण्याची जबाबदारीही आठवले यांच्यावर होती.

'अमृतमंथन' या चित्रपटापासून शांताराम आठवले यांनी प्रभातच्या अनेक चित्रपटांचे गीतलेखन केले. त्यांनी लिहिलेली 'अहा भारत विराजे', 'भारती सृष्टीचे सौंदर्य', 'उसळत तेज भरे', 'हासत वसंत ये वनी', 'राधिका चतुर बोले', 'लखलख चंदेरी', 'दोन घडीचा डाव' ही सारी गीते प्रासादिक, नादमधुर व अर्थपूर्ण होती. आपल्या पद्यरचनेने शांताराम आठवले यांनी पद्यरचनेचा श्रेष्ठ आदर्श घालून दिला.

आठवले यांनी लिहिलेल्या 'आधी बीज एकले' या 'संत तुकाराम'मधील अभंगाला तुकारामाची प्रतिष्ठा आणि पावित्र्य लाभले. संतवाङ्मयाचे गाढे अभ्यासक हभप पांगारकर यांनी हा अभंग ऐकला. तुकारामांचा हा अभंग आपल्या दृष्टीतून कसा सुटला याचे आश्चर्य वाटून त्यांनी तुकारामाची गाथा पुन्हा धुंडाळली, या पांगारकर यांच्या कृतीतच आठवले यांच्या काव्यप्रतिभेचे वैशिष्ट्य अधोरेखित होते. प्रभातमध्ये आठवले १९३४ ते १९४३ अशी नऊ वर्षे होते. नंतर ते दिग्दर्शनाकडे वळले. शांतारामबापूंबरोबर काम करताना त्यांनी दिग्दर्शनातील बारकावे व वैशिष्ट्ये आत्मसात केली. आठवले यांनी १९४८ साली 'भाग्यरेखा' हा चित्रपट निर्माण व दिग्दर्शित केला. त्यानंतर त्यांनी 'मै अबला नहीं', 'वहिनीच्या बांगड्या', 'संसार करायचाय मला', 'शेवग्याच्या शेंगा', 'पडदा' असे अनेक चित्रपट दिग्दर्शित केले. १९५९मध्ये भारत सरकारच्या 'फिल्म्स डिव्हिजन'मध्ये दिग्दर्शक म्हणून त्यांची नियुक्ती झाली. तिथे त्यांनी अनेक अनुबोधपटांचे दिग्दर्शन केले.

'एकले बीज' व 'बीजांकुर' हे काव्यसंग्रह व 'प्रभातकाल' हे 'प्रभात'मध्ये असतानाच्या काळात लिहिलेले त्यांचे आत्मकथन प्रसिद्ध आहे. त्यांना १९६५ सालच्या 'वावटळ' चित्रपटासाठी उत्कृष्ट दिग्दर्शनाचे महाराष्ट्र शासनाचे प्रथम पारितोषिक मिळाले. त्यांचा 'ज्ञानेश्वरी'चा व 'ज्योतिषशास्त्रा'चा अभ्यास दांडगा होता. आध्यात्मिक वृत्तीने ते निवृत्तीचे जीवन जगत होते.

**-मधू पोतदार**

# कवी, लेखक माधव ज्यूलियन

माधव ज्यूलियन हे मराठी भाषेतील अग्रणी कवी, रविकिरण मंडळाचे संस्थापक आणि सर्वांत यशस्वी सदस्य होते तसेच ते फारसी आणि इंग्रजी विषयाचे प्राध्यापकसुद्धा होते. मुंबई विद्यापीठाच्या मराठी साहित्यातील देशभरातील पहिल्या-वहिल्या डी. लिट. पदवीचे ते मानकरी आहेत. २९ नोव्हेंबर रोजी त्यांचा स्मृतिदिन. २१ जानेवारी १८९४ रोजी बडोदा येथे डॉ. माधव त्र्यंबक पटवर्धन उर्फ माधव ज्यूलियन यांचा जन्म झाला.

कवी माधव यांनी पटवर्धनऐवजी ज्यूलियन नाव लावण्यामागे दोन आख्यायिका ऐकायला मिळतात. इंग्लिश कवी शेले याने रचलेल्या ज्यूलियन आणि मडालो या कवितेवरून त्यांनी ज्यूलियन असे टोपणनाव धारण केले. याशिवाय 'गॉड्ज गुड मेन' या कादंबरीतील नायिका ज्यूलियन या व्यक्तिरेखेवरून माधवरावांनी ज्यूलियन हे नाव घेतले, असेही सांगितले जाते.


१९१६मध्ये माधव पटवर्धन यांनी फारसी भाषा हा विशेष विषय निवडून बीएची पदवी मिळवली. त्यानंतर १९१८मध्ये इंग्रजी साहित्य या विषयात त्यांनी एमएचा पदव्युत्तर अभ्यास पूर्ण केला. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर १९१८ ते १९२४ या कालावधीत ते फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे येथे फारसी भाषा शिकवू लागले. त्यानंतर कोल्हापूरमधील राजाराम महाविद्यालयात ते फारसी भाषेचे प्राध्यापक म्हणून रूजू झाले. १९२५ ते १९३९ या कालावधीत त्यांनी तेथे अध्यापनाचे कार्य केले. दरम्यान, १ डिसेंबर १९३८ रोजी माधव त्र्यंबक पटवर्धन यांना त्यांच्या 'छंदोरचना' या ग्रंथासाठी मुंबई विद्यापीठाने डी.लिट. ही पदवी देत कवी माधव ज्यूलियन यांचा सन्मान केला.




गझल आणि रुबाई हे काव्यप्रकार फारसीमधून मराठीत आणण्याचे श्रेय कवी माधव ज्यूलियन यांना दिले जाते. माधव ज्यूलियन यांनी 'दित्जू', 'मा.जू' आणि 'एम. ज्यूलियन' या नावानेसुद्धा लेखन केले आहे. यापैकी काही लिखाण त्यांनी इंग्रजीमध्ये केले आहे. एवढेच नाही तर कविवर्य भा. रा. तांबे यांच्या कवितांचे संकलन आणि संपादनसुद्धा माधव ज्यूलियन यांनी केले. उत्कृष्ट संपादनाचा एक नमुना म्हणून याकडे पाहिले जाते. कवितांशिवाय माधव ज्यूलियन यांनी भाषाशास्त्रीय लेखनसुद्धा केले. ते नेहमीच सोप्या व शुद्ध मराठीचा पुरस्कार करत आणि म्हणूनच त्यांनी भाषाशुद्धी-विवेक हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथात कालबाह्य ठरलेल्या शेकडो मराठी शब्दांची सूची समाविष्ट करण्यात आली आहे. त्यांच्या एकूण प्रकाशित साहित्यामध्ये स्फुट गझला, खंडकाव्य, दीर्घकाव्य, काव्यसंग्रह, अनुवादित लेख, संशोधनात्मक व भाषांतरीत वाङ्मय प्रकारांचासुद्धा समावेश आहे. त्यांच्या प्रकाशित कवितांपैकी 'कशासाठी पोटासाठी', 'जीव तुला लोभला माझ्यावरी', 'प्रेम कोणीही करीना', 'प्रेमस्वरूप आई', 'मराठी असे आमुची मायबोली' या कविता खूपच प्रसिद्ध आहेत. १९३३ साली नाशिक येथे पार पडलेल्या कविसंमेलनाचे त्यांनी अध्यक्षपद भूषवले होते, तर १९३४ रोजी बडोदे येथे झालेल्या साहित्य संमेलनात ते कविशाखेचे अध्यक्ष होते. १९३६मध्ये जळगाव येथे आयोजित मराठी साहित्य संमेलनाचेसुद्धा कवी माधव ज्यूलियन यांनी अध्यक्षपद भूषवले होते.

इ. स. १९३३मध्ये नाशिक येथे झालेल्या कविसंमेलनाचे माधव ज्युलियन यांनी अध्यक्षपद स्वीकारले होते. इ. स. १९३४मध्ये बडोदे येथे झालेल्या साहित्यसंमेलनात ते कविशाखेचे अध्यक्ष होते. इ. स. १९३६मध्ये जळगाव येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. पुण्यातल्या टिळक रोडवरील महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सभागृहाला माधवराव पटवर्धन सभागृह असे नाव देण्यात आले आहे.

**(साभार : इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान



# जुन्या फोनला असे बनवा सीसीटीव्ही कॅमेरा


आता स्मार्टफोन हा मानवाच्या दैनंदिन जीवनाचा एक भाग बनला आहे. फोनमध्ये येणाऱ्या नवनव्या वैशिष्ट्यांमुळे लोक त्यांचा फोन नेहमीच बदलत असतात. तुमच्याकडेही जुना स्मार्टफोन असेल आणि तुम्हाला त्याचे काय करायचे? असा प्रश्न पडला असेल, तर तुमच्याकडे फोन सीसीटीव्ही कॅमेरा म्हणून वापरण्याचा पर्याय आहे. तुम्ही अगदी सोप्या स्टेप्स फॉलो करून हे करू शकता.

सर्व्हिलान्स सिस्टिम बसवण्यासाठी हजारो रुपये खर्च करावे लागतात, पण तुमची इच्छा असेल, तर तुम्ही तुमचा जुना स्मार्टफोनही सिक्योरिटी कॅमेरा म्हणून यूज करू शकता. विशेष म्हणजे यासाठी आपल्याला कोणतेही वेगळे अटॅचमेंट खरेदी करण्याची गरज नाही. याच्या सहाय्याने तुम्हाला केवळ लाइव्ह फुटेजच पाहता येणार नाही, तर डिव्हाइसमध्ये सर्व्हिलांन्स फुटेज सेव्हही करता येईल. जाणून घ्या स्टेप्स...

सर्वप्रथम आपल्याला आपल्या जुन्या फोनध्ये सिक्योरिटी कॅमेरा ॲप इंस्टॉल करावे लागेल. गुगल प्ले स्टोर आणि ॲपल ॲप स्टोअरवर जे ॲप क्रॉस-प्लॅटफॉर्म फंक्शनॅलिटीशिवाय लोकल आणि क्लाऊड स्ट्रिमिंग आणि क्लाऊडवर फुटेज स्टोर करण्यासारखे अथवा मोशन डिटेक्ट अलर्ट्स पाठविण्यासारखे फीचर्स देईल असे ॲप निवडायला हवे. असे एक ॲप आहे, Alfred DIY CCTV Home Camera आणि हे सेट करणेही सोपे आहे. तुमच्या जुन्या आणि नव्या फोनवर Alfred DIY CCTV Home Camera ॲप डाउनलोड करा. आपल्या नव्या प्रायमरी फोनमध्ये ॲप ओपेने केल्यानंतर, स्क्रीनवर दिसणाऱ्या सूचनांचे पालन करत, 'Start' वर टॅप करा. आता 'Viewer' निवडल्यानंतर, 'Next'वर टॅप करावे लागेल. यानंतर आपल्याला आपल्या Google Account च्या मदतीने Sign In करावे लागेल. जुन्या फोनवरही हीच प्रक्रिया करत आपल्याला 'Viewer'च्या ऐवजी 'Camera' निवडायचा आहे आणि त्याच Google अकाउंटला लॉगिन करायचे आहे. सेटिंग्जमध्ये जाऊन इतर आवश्यक बदल करू शकाल. जुन्या फोनच्या कॅमेऱ्याने रेकॉर्ड केलेले फीड प्रायमरी फोनमध्ये दिसेल.

# कादंबरीकार, समीक्षक वामन जोशी

मराठी कादंबरीकार, साहित्यसमीक्षक आणि तत्त्वचिंतक. जन्म तत्कालीन कुलाबा (आता रायगड) जिल्ह्यातील तळे गावी २१ जानेवारी १८८२ रोजी झाला. पुण्याच्या डेक्कन कॉलेजातून तत्त्वज्ञान आणि तर्कशास्त्र हे विषय घेऊन एमए झाले (१९०६). त्यानंतर वि. गो. विजापूरकर यांनी कोल्हापूर येथे राष्ट्रीय शिक्षण योजनेखाली चालविलेल्या समर्थ विद्यालयात अध्यापनाचे काम केले. वामन मल्हार जोशी यांचा आज स्मृतीदिन आहे.



## निमित्त

विजापूरकरांच्या बरोबर विश्ववृत ह्या मासिकाच्या संपादनाची जबाबदारीही स्वीकारली. याच मासिकात १९०८ साली प्रसिद्ध झालेल्या 'वैदिक धर्माची तेजस्विता' या लेखाबद्दल राजद्रोहाचा आरोप येऊन त्यांना आणि विजापूरकरांना दंडाची व तीन वर्षाच्या सक्तमजुरीची शिक्षा झाली. तुरुंगातून सुटल्यानंतर (१९११) पाच वर्षे केसरी-मराठा संस्थेत त्यांनी काम केले. त्यानंतर काही काळ अच्युत बळवंत कोल्हटकर यांच्या मेसेज या इंग्रजी दैनिकाचे ते उपसंपादक होते. पुढे महर्षी कर्वे यांच्या हिंगणे येथील पाठशाळेत प्राध्यापक म्हणून ते दाखल झाले (१९१८) व सेवानिवृत्तीपर्यंत त्याच संस्थेत वेगवेगळ्या पदांवर काम करीत राहिले.

रागिणी अथवा काव्यशास्त्रविनोद (दुसरी आवृ. १९१५) या पहिल्याच कादंबरीमुळे त्यांचे नाव सर्वतोमुखी झाले. त्यानंतर आश्रमहरिणी (१९१६), नलिनी (१९२०), सुशिलेचा देव (१९३०), इंदु काळे व सरला भोळे (१९३४) अशा चार कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. वाचकाचे मनोरंजन करण्यापेक्षा त्याला विचार करावयास लावण्यासाठी त्यांचे कादंबरीलेखन मुख्यतः झालेले आहे. त्यातून त्यांची तत्त्वचिंतक वृत्ती प्रकर्षाने व्यक्त होते. कर्तव्य आणि ध्येयनिष्ठा; कलाप्रेम आणि नीतिबंधने; बुद्धी आणि श्रद्धा; व्यक्तिस्वातंत्र आणि सामजिक-नैतिक बंधने यांसारखे जीवनविषयक मौलिक प्रश्न त्यांनी कादंबऱ्यांतून उपस्थित केले. त्यांच्याच दृष्टीने 'नकटी' ठरणारी नलिनीसारखी कादंबरीही ह्यास अपवाद नाही. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर ह्यांनी मराठीतील तात्त्विक कादंबरीच्या जनकत्वाचा मान त्यांना दिला आहे.

कादंबऱ्याप्रमाणेच त्यांच्या अन्य लेखनालाही एक लक्षणीय वैचारिक बैठक आहे. राष्ट्रवाद, गांधीवाद, समाजवाद, मार्क्सवाद इ. प्रभावी विचारप्रणालींच्या ऐन उत्कर्षाच्या काळात त्यांचे लेखन झाले. तथापि या सर्वच वादांच्या बाबतींत त्यांची भूमिका सदैव डोळस मध्यममार्गीयाचीच राहिली. 'कारणानाम् अनेकता' हे तत्त्व त्यांच्या मनावर इतके बिंबलेले होते की कोणतीही आत्यंतिक वैचारिक भूमिका त्यांना कधीच मानवली नाही. साहीत्यसमीक्षेच्या क्षेत्रातही कलावादी आणि जीवनवादी यांच्या झगड्यात त्यांची भूमिका समंजस मध्यस्थाचीच राहिली. विचार-विलास (१९२७), विचारसौंदर्य (१९४०), विचारलहरी (१९४३) व विचार-विहार (१९४४) हे त्यांच्या राजकारण, नीतिशास्त्र, मानसशास्त्र, साहित्य इ. विविध विषयांवरील चर्चात्मक लेखांचे संग्रह. त्यांचे साहित्यसमीक्षात्मक लेखन थोडेच असले, तरी त्यातून साहित्यविषयक मूलभूत प्रश्न उपस्थित करून त्यांची सोडवणूक कोणत्या दृष्टीने करावी याचे अचूक मार्गदर्शन त्यांनी केले आहे. म्हणूनच त्यांना साहित्याच्या क्षेत्रात तात्यासाहेब केळकर व श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्याइतकेच महत्व प्राप्त झाले. मडगाव येथे १९३० साली झालेल्या पंधराव्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. मुंबई येथे २० जुलै १९४३ रोजी ते त्यांचे निधन झाले. **(साभार : विकासपीडिया)**

## बातमीतील बात




# आरोग्य प्रहर

## अपुऱ्या झोपेमुळे हृदयावर ताण? टिप्स करा फॉलो

निरोगी हृदय राखण्यासाठी रात्रीच्या वेळी पुरेशी झोप घेणे महत्त्वाचे आहे. अपुरी किंवा खराब-गुणवत्तेची झोप उच्च रक्तदाब आणि हृदयविकाराशी संबंधित आहे. दुर्दैवाने, बर्याच लोकांना पुरेशी झोप मिळत नाही आणि बहुतेक लोकांना दिवसा झोप येते. किमान आठ तास शांत झोप घेणे ही काळाची गरज आहे. परंतु अनेकजण त्यांच्या व्यस्त वेळापत्रकामुळे फक्त पाच-सहा तासच झोपतात, परंतु संपूर्ण आरोग्य निरोगी राहण्यासाठी झोपेच्या चांगल्या सवयी बाळगणे गरजेचे आहे. याबाबत फिजिशियन, डायबेटोलॉजिस्ट आणि इंटेन्सिव्हिस्ट डॉ. सचिन नलावडे यांनी सविस्तर माहिती दिली आहे.



ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे हृदयाचे कार्य कसे बदलते यासह शरीरातील प्रत्येक अवयवावर याचा परिणाम होत असतो. हृदय आणि फुफ्फुसे दोन्ही छातीच्या पोकळीतील जागा व्यापत असल्याने, फुफ्फुसाच्या कार्यावर ताण येऊन हृदयाच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो. या शारीरिक ताणामुळे हृदयाचे स्नायू घट्ट होऊ शकतात आणि संपूर्ण हृदयाचे कार्यात बिघड निर्माण होऊ शकतो तसेच उच्च रक्तदाब आणि हृदयाची गती वाढू शकते. स्लीप ॲपनिया हा दिवसभराचा थकवा, मोठ्याने घोरणे आणि श्वास गुदमरल्यासारखे आवाज येणे, सकाळच्या वेळी डोकेदुखी, उठल्यावर तोंड कोरडे पडणे आणि शांत झोप न लागणे यासारख्या समस्या दिसू शकतात. ऑब्स्ट्रक्टिव्ह स्लीप एपनिया विकसित होण्याचा धोका वयानुसार वाढतो.

रात्रीच्या शांत झोपेची तयारी ही झोपेच्या आधीपासूनच सुरू होते. दिवसा सूर्यप्रकाशाच्या संपर्कात येण्यामुळे तुमच्या शरीराला दिवसाची वेळ असल्याचे संकेत मिळतो, ज्यामुळे झोपेची गती वाढते आणि मेलाटोनिन, स्लीप हार्मोनचे उत्पादन सुरू होते.

जेव्हा शक्य असेल तेव्हा दुपारनंतर कॅफेनयुक्त पदार्थांचे सेवन टाळा कारण त्याचे परिणाम रात्रीपर्यंत टिकून राहतात.

झोपण्यासाठी पुरेसा काळोख आणि थंड वातावरण निर्मिती करा आणि रात्री उशिरापर्यंत उत्तेजक क्रियांपासून दूर राहा. जसे की व्यायाम किंवा इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा वापर.

सौम्य संगीत ऐका, गरम पाण्याने आंघोळ करा किंवा टिव्ही पाहण्याऐवजी झोपण्यापूर्वी वाचन करा. झोपण्यापूर्वी पाणी पिणे टाळा, कारण तुम्हाला सतत लघवीसाठी उठावे लागेल आणि तुम्हाला शांत झोप घेती येणार नाही.

# जिल्ह्यात स्वच्छतेच्या कामांना प्राधान्य द्या

## मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांचे निर्देश

**अलिबाग. : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात स्वच्छ भारत अभियानाची प्रभावी अंमलबजावणी सुरु असून अनेक गावे स्वच्छतेच्या बाबतीत आदर्श होत आहेत. जिल्ह्यातील ८०९ ग्रामपंचायतीमधील एक हजार ८३० गावांपैकी एक हजार ५४६ गावे ओ.डी.एफ प्लस मॉडेल झाली आहेत.



१५व्या वित्त आयोगातील बंधित निधीमधून जास्त जास्त निधी स्वच्छतेच्या कामावर खर्च करण्याचे निर्देश राजगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी जिल्ह्यातील सर्व गटविकास अधिकारी यांना दिले.

ग्रामपंचायतीनी सन २९२५-२६चा गाव कृती आराखडा तयार करताना स्वच्छ भारत मिशन व १५व्या वित्त आयोगाच्या बंधित निधीतून सार्वजनिक कंपोष्ट पिट, प्लास्टिक संकलन शेड, सांडपाणी व्यवस्थापनासाठी स्थिरीकरण तळे, सार्वजनिक शोषखड्डे,सांडपाणी प्रक्रिया केंद्र, कचरा विलगीकरण केंद्र, घरगुती व सार्वजनिक स्तरीय कचराकुंड्या घेणे, कचरा वर्गीकरण व परिसर सफाईसाठी उपयुक्त अवजारे व कर्मचारी यांचेसाठी संरक्षण साहित्य घेणे, खत टाकी/नाडेप/गांडूळखत प्रकल्प उभारणी, गोबरधन आणि प्लास्टिक कचरा प्रक्रिया देखभाल व दुरुस्ती, कम्पोष्टिंग साठी आवश्यक साहित्य घेणे, प्लास्टिक कचरा वाहतुकीसाठी वाहनाची व्यवस्था करणे, वैयक्तिक व सार्वजनिक शौचालयाचे रेट्रोफिटिंग, कचरा गोळा करून त्याचे वर्गीकरण करणे यासाठीचे मानधन व वेतन,तीन चाकी सायकल/बँटरी आधारित सायकल घेणे या कामाना प्राधान्य देण्यासाठी हा निधी ग्रामपंचायतीनी वापरावा, असेही डॉ. भरत बास्टेवाड यांनी सांगितले.

जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालये,पाणीपुरवठा योजना, पथ दिवे हे सौरउर्जा प्रकल्पावरअसतील असे नियोजन करावे. ही कामे आराखड्यात न घेतल्यास संबाधीतावर योग्य ती प्रशासकीय कारवाई करणात येईल अशा सक्त सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी जिल्ह्यातील सर्व गटविकास अधिकारी यांना दिल्या आहेत. यामुळे ही गावे स्वच्छ, सुंदर व आरोग्यसंपन्न होतील व स्वच्छतेत सातत्य राहण्यास मदत होणार आहे.

# महिलांच्या टी-२० स्पर्धेसाठी रायगड जिल्ह्याचा संघ जाहीर

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन (एमसीए) आयोजित आंतरजिल्हा टी-२० निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेसाठी रायगड जिल्ह्याच्या महिलांचा संघ जाहीर करण्यात आला आहे. संघाचे कर्णधारपद गार्गी साळुंके हिच्याकडे देण्यात आले असून तर उपकर्णधार म्हणून वैभवी कुळकर्णी हिची निवड करण्यात आली आहे.

याशिवाय संघात रोशनी पारधी, साची बेलोसे, अनिषा कांबळे, अपर्णा सिंग, तनिष्का वार्गे, आर्य पाटील, निशिता विठलानी, काजल साळुंके, ईश्वरी खत्री, अमिषा बामणे, आर्या शेंडगे, अपर्णा गायकवाड राखीव खेळाडू म्हणून श्रुती अडीत, मनीषा भारद्वाज, अपेक्षा पवार, समिधा तांडेल, वेदश्री शेळके, शुभांगी दास, वेदिका तेटागुळे, अनिष्का वर्मा यांचा समावेश आहे. हा संघ एमसीएच्या टी-२० स्पर्धेत पुणे येथे सहभागी होणार आहे. संघाला रायगड जिल्हा किकेट असोसिएशनचे (आरडीसीए) अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सचिव प्रदीप नाईक यांच्यासह सर्व पदाधिकारी व सदस्यांनी शुभेच्छा दिल्या.

# श्रीवर्धनमध्ये भव्य कबड्डी चषक स्पर्धा रंगणार

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने श्रीवर्धन येथील श्री सोमजादेवी मंदिराच्या पटांगणावर २६ जानेवारी रोजी भव्य कबड्डी चषक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्व. प्रतोषभाई कोलथरकर यांच्या स्मरणार्थ ही स्पर्धा होणार आहे. पिंट्याभाई वेश्वीकर आणि प्रसाद नाझरे मित्र मंडळाच्या वतीने होणाऱ्या या स्पर्धेत सांघिक व वैयक्तिक पारितोषिके दिली जाणार आहेत. स्पर्धेचे नियोजन अमर सोमजाई क्रीडा मंडळ करीत आहे. स्पर्धा २६ जानेवारीला सायंकाळी ४ वाजता सुरू होईल. कबड्डी संघांनी यामध्ये सहभागी होण्याचे आणि क्रीडाप्रेमींनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.


सिडको
शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून,खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **करारनामा / वाटपपत्र** प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | नोड व संचिका क्र. | गाव व निवाडा क्र. | सर्व्हे क्र./ हि.क्र. | संपादित क्षेत्र (हे.आर.) | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्य:स्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **ता. पनवेल, जि. रायगड** | | | | |
| १ | उलवे ८० | गव्हाण ४८५/५५० | ९१/५ | ०-१२-४ | १०० चौ.मी. प्रस्तावित | उलवे नोड येथील भूखंड क्र.९५, सेक्टर-१७, क्षेत्र-१०० चौ.मी. | १) कै. देवू चंदर घरत (मयत) यांचे वारस १.१) श्री. रमण देवू घरत, १.२) श्री. उदय देवू घरत, १.३) श्री. ज्ञानेश्वर देवू घरत-मयत १.३.१) श्रीमती सुमन ज्ञानेश्वर घरत, १.३.२) कु. सोनम ज्ञानेश्वर घरत, १.३.३) कु. मोनिका ज्ञानेश्वर घरत, १.३.४) कु. दिव्या ज्ञानेश्वर घरत, १.४) श्रीमती निर्मला जनार्दन नाईक, १.५) श्रीमती अनुसया रघुनाथ ठाकूर, १.६) श्रीमती द्रोपदी तुकाराम घरत, १.७) श्री. नामदेव देवू घरत, १.८) श्री. दयानंद देवू घरत, २) कै. बुधाजी चंदर घरत (मयत) यांचे वारस २.१) श्री. गोवर्धन बुधाजी घरत २.२) श्री. पांडुरंग बुधाजी घरत, २.३) श्री. कमलाकर बुधाजी घरत, २.४) श्री. गजानन बुधाजी घरत, २.५) श्री. रणधीर बुधाजी घरत, २.६) श्रीमती यशोदा शरद पाटील, २.७) श्रीमती नर्मदा गजानन गोंधळी, २.८) श्रीमती साधना अनंत घरत, २.९) श्रीमती मंजुळा पंढरीनाथ ओवळेकर | - |
| | | गव्हाण १५४ | १६०/१ | ०-८-८ | १०० चौ.मी. प्रस्तावित | उलवे नोड येथील भूखंड क्र.१३१, सेक्टर-१७, क्षेत्र-९९.३५ चौ.मी. | | |
| | | | | **मौजे वळवली ता. पनवेल, जि. रायगड** | | | | |
| २ | **२१+५० अ+६५ +७२ कामोठे** | मौजे वळवली ९७+१०६ | ८८/५+६/२<br>८८/१ | ०-७९-३<br>०-०९-६ | २४०० चौ.मी. पैकी १०० चौ.मी. | भूखंड क्र.७२अ, सेक्टर-२२, क्षेत्र-१०० चौ.मी. | १) दशरथ जगन पाटील (मयत) मृत्यु दिनांकः ९/४/२००२ २) बाबु रामजी पाटील (मयत) मृत्यु दिनांक: २७/१०/१९८३ यांचे वारस<br>१.१) भाऊ जगन पाटील १.२) बळीराम जगन पाटील (मयत) १.३) विठाबाई विष्णु पारधी १.४) रखमाबाई किसन पारधी १.५) प्रेमा दशरथ पाटील १.६) सुनिता दशरथ पाटील १.७) पुष्पा दशरथ पाटील १.८) मयुर दशरथ पाटील १.९) सरस किसन पाटील १.१०) मिनाक्षी किसन पाटील<br>**वारस दाखला क्र. CMA १९४/२००२ दिवाणी चौकशी अर्ज क्र. CMA १९४/२००२**<br>१.२) बळीराम जगन पाटील (मयत) मृत्यु दिनांकः ११.०५.२००७ यांचे वारस<br>१.२.१) प्रेमा दशरथ पाटील १.२.२) मयुर दशरथ पाटील १.२.३) पुष्पा दशरथ पाटील १.२.४) सुनिता मेघनाथ म्हात्रे १.२.५) सरस किसन पाटील १.२.६) मिनाक्षी गणेश भोईर १.२.७) भाऊ जगन ऊर्फ जगन्नाथ पाटील १.२.८) संध्या किसन पारधी १.२.९) विठा विष्णु पारधी<br>**वारस दाखला क्र. CMA ११८/२०२४ दिवाणी चौकशी अर्ज क्र. CMA ११८/२०२४**<br>उक्त नमुद भूधारकांपैकी रखमाबाई किसन पारधी व संध्या किसन पारधी या एकच व्यक्ती असल्याबाबत दिनांक १२ ते १८ डिसेंबर २०२४ च्या महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात नाव, वय व धर्म बदलण्याच्या जाहिरातींच्या विभागात प्रसिध्दी देण्यात आलेली आहे | - |
| | | मौजे वळवली १०६ | ३९/१+२<br>१३१/५<br>२/२अ | १-०३-०<br>०-०३-५<br>०-४५-३ | | | | |
| | | मौजे वळवली ५२ | ८/४ब | ०-३७-० | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पूरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
सिडको भवन, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (पनवेल)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
**सिडको/जनसंपर्क/४१०/२०२४-२५**



# जाहिर निविदा

आदर्श नागरी सहकारी पत्तसंस्था मर्या, अलिबाग या संस्थेच्या खोपोली शाखेकरीता तसेच पुणे शाखे करीता सिव्हील वर्क, फर्निचर अनुषंगीक / इंटेरिअर कामाचे क्षेत्रांतील खालील स्वरूपाची कामे करणा-या मान्यवर व अनुभवी कॉन्टॅक्टर्स यांचेकडून प्रकारनिहाय, स्वतंत्र माल मजूरीसह निविदा मागविणेत येत आहेत.

अ.नं. कामाचे नांव व प्रकार

खोपोली नगरपालिका हदिदत असलेल्या खोपोली शाखेच्या युनीमॉन्ट इम्पेरीया, जूना खोपोली- पुणे महामार्गावरील ए विंग मधिल पहिल्या मजल्यावरील व्यापारी गाळा क्र. २० अे जागा अंदाजे २०.२९४ चौरस मीटर, व्यापारी गाळा क्र. २२ अे अंदाजे १८.५७९ चौरस मीटर व व्यापारी गाळा क्र. २१ अे अंदाजे १९.३८७ चौरस मीटर जागेमध्ये खालील प्रकारची कामे करणे.

तसेच संस्थेच्या पुणे शाखेसाठी घेतलेल्या मायरा इन्क्लेव्ह शिवगंगा सोसायटी वारजे चर्च जवळ, कॅनल रोड, वारजे पुणे ४११०५८ या ईमारतीमध्ये तळमजल्यावरील दोन व्यापारी गाळे कमांक ०३ व ०४ अंदाजे क्षेत्रफळ ३५० स्क्वेअर फूट जागेमध्ये खालील प्रकारची कामे करणे.

१. सिव्हील वर्क
२. अॅल्युमिनीयम विंडो
३. फर्निचर
४. पिओपी फॉल सिलिंग
५. इलेक्ट्रीकल वर्क
६. नामफलक
७. इलेक्ट्रीकल फिक्चर
८. प्लंबिंग वर्क
९. रंगकाम
१०. वर नमूद केल्याप्रमाणे व त्या अनुषंगाने येणारी इतर कामे

इच्छुक निविदाधारकांनी वरील खोपोली व पुणे शाखांच्या कामाच्या निविदा संस्थेच्या मुख्य कार्यालय आदर्श भवन, श्रीबाग नं.३. भाउ जगे उदयानासमोर, अलिबाग येथे दिनांक २८. ०१.२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत खाली सहि करणारे स्वाक्षरीकार यांचे नावाने सादर कराव्यात याबाबत अधिक माहिती संस्थेच्या मुख्य कार्यालयात मिळेल,

कोणतेही कारण न देता कमी अगर जास्त दराची कोणतीही अथवा सर्व निविदा अगर निविदेमधिल कोणताही आयटम अगर आयटेमस् कोणत्याही कारणाशिवाय स्विकारणे अथवा नाकारणेचा हक्क संस्थेने राखून ठेवला आहे. मुदतीनंतर आलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.

**मुख्य कार्यालय, अलिबाग**
**दि. २१.०१.२०२५**

**सही/-**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**



**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५२/१५४ अन्वये दाखल अपिल/पुनरिक्षण इतर अर्ज अन्वये जाहिर सुनावणी नोटीस**

अपिल अर्ज क्र. २३/२०२४

मे, अधिराज कन्ट्रक्शन प्रा.लि.
पत्ता:- ऑफिस नं.५०६, श्रध्दा चेंबर्स,
१५, न्यू मरीन लाईन, मुंबई- ४०००२०
— अर्जदार

**विरुध्द**

१) अध्यक्ष/सचिव
अधिराज गार्डन को-ऑप हौसीग सोसायटी फेडरेशन्स,
भुखंड क्र. ३२, सेक्टर- ०५, खारघर, नवी मुंबई
२) अध्यक्ष/सचिव
अॅक्वा ए बिंग सहकारी गृहनिर्माण संस्था,
भुखंड क्र. ३२, सेक्टर- ०५, खारघर, नवी मुंबई
३) अध्यक्ष/सचिव
अॅक्वा बी विंग सहकारी गृहनिर्माण संस्था,
भुखंड क्र. ३२, सेक्टर-०५, खारघर, नवी मुंबई
४) अध्यक्ष/सचिव
क्रिप्रेस सहकारी गृहनिर्माण संस्था,
भुखंड क्र. ३२, सेक्टर-०५, खारघर, नवी मुंबई
५) अध्यक्ष/सचिव
अस्पेन सहकारी गृहनिर्माण संस्था,
भुखंड क्र. ३२, सेक्टर- ०५, खारघर, नवी मुंबई
६) अध्यक्ष/सचिव
मॅनगोलीया सहकारी गृहनिर्माण संस्था,
भुखंड क्र. ३२, सेक्टर- ०५, खारघर, नवी मुंबई
७) अध्यक्ष/सचिव
मॅगनम एम-१ सहकारी गृहनिर्माण संस्था,
भुखंड क्र. ३२, सेक्टर- ०५, खारघर, नवी मुंबई
८) अध्यक्ष/सचिव
मॅगनम एम-२ सहकारी गृहनिर्माण संस्था,
भुखंड क्र. ३२, सेक्टर-०५, खारघर, नवी मुंबई
९) अध्यक्ष/सचिव
झिनिया सहकारी गृहनिर्माण संस्था,
भुखंड क्र. ३२, सेक्टर- ०५, खारघर, नवी मुंबई
१०) सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (सिडको),
पत्ता : टॉवर नं.०८, पाचवा मजला,
बेलापूर रेल्वे स्टेशन कॉम्प्लेक्स, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई
— जाब देणारे

अर्जदार यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५२/१५४ अन्वये अपिल/पुनरिक्षण अर्ज या कार्यालयात दिनांक १९/०९/२०२४ रोजी दाखल केला आहे. सदर अर्जाच्या अनुषंगाने या कार्यालयात दिनांक १३/०२/२०२५ रोजी सकाळी/ दुपारी १२.०० वाजता सुनावणी आयोजित करण्यांत येत आहे.

आपण व्यक्तीशः अथवा यथोचितरित्या नियुक्त केलेल्या प्रतिनिधीमार्फत उत्तर दाखल केले नाही किंवा वरील दिनांकास उपस्थित राहिला नाही तर सदर प्रकरणाची सुनावणी घेवून उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सुनावणीच्या नोटीसा व त्यासोबतची कागदपत्र अर्जदार यांनी प्रतिवादींना पोहच करुन तशी पोहच सुनावणी दिवशी सादर करणे आवश्यक आहे.

**सही/-**
**संहनिबंधक**
**सहकारी संस्था, सिडको, नवी मुंबई.**



# म.औ.वि.म.

मऔविम

## शुध्दीपत्रक

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने दैनंदिन "रामप्रहर" या वृत्तपत्रात दि८ ऑगस्ट २०२३ रोजी प्रसिध्द केलेल्या जाहीर सूचनेमध्ये मे.मुंबई वेस्ट मॅनजमेंट लि. यांना प्रस्तावित सामायिक धोकादायक टाकाऊ पदार्थाचे व्यवस्थापन सुविधा प्रकल्प स्थापन करण्यासाठी अतिरीक्त पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील भूखंड क्रमांक ई-१३५, ई-१३६, ई-१३८,E-१४०,E-१४८ आणि E-१५० असे एकूण क्षेत्रफळ १,६१,००० m२ वाटप करताना अनवधानाने भूखंड क्रमांक ई-१४९ चा उल्लेख करावयाचा राहिला. सबब, वाटप केलेले भूखंड हे क्रमांक E-१३५, E-१३६, E-१३८, E-१४०, E-१४८, E-१४९ आणि E-१५० असे वाचण्यात यावे. तथापि,या सर्व भूखंडांचे एकूण क्षेत्रफळ १,६१,००० m२ एवढेच राहील आणि ८ ऑगस्ट २०२३ च्या जाहीर सुचनेमधील इतर सर्व अटी व शर्ती लागू राहतील.

सही/-
पी. वेलरासू, भाप्रसे
मुख्य कार्यकारी अधिकारी,
मऔविम,मुंबई-९३

दि.: २१/०१/ २०२५



# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

मऔविम

ई निविदा सूचना क्रमांक ६५/२०२४-२०२५ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | पेण अलिबाग विभाग पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.... मेसर्स आरसीएफ थळकरीता टाकण्यात आलेल्या १३०० मि.मी. व्यासाच्या मृदु पोलादी जलवाहिनीची दैनंदिन देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹ ३७,३६,६८३.०० |
| २ | पेण अलिबाग विभाग पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती........... अलिबाग कार्यालय परिसरातील लॉनची व देखभाल करणे व वृक्षांची छाटणी करणे. | ₹ १५,८७,९२९.०० |
| ३ | पाताळगंगा येथील नवीन पाणी पुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती...... पाताळगंगा येथील ई-लेआउट बूस्टर पंप हाऊस मधील अनुषंगिक विद्युत कामासह, ३ मेट्रिक टन क्षमतेची HOT क्रेन ३ मेट्रिक टन क्षमतेच्या EOT क्रेनने बदलणे. | ₹ ३६,८३,८७५.०० |
| ४ | पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील नवीन पाणीपुरवठा योजना व सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती.... पाताळगंगा येथील बुस्टर पंप हाऊस व सांडपाणी निःसारण उदंचन गृहातील सबमर्सिबल नॉन क्लॉग पंपांची दुरुस्ती करणे. | ₹ ४०,२५,९१४.०० |
| ५ | महाड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती...सावित्री धरणाच्या स्थिर बेसिनजवळील विद्यमान एलएचएस मार्गदर्शक भिंतीचे मजबुतीकरण करणे. | ₹ ३९,६९,५६७.०० |
| ६ | रोहा येथील निवासी इमारतीची देखभाल व दुरूस्ती..... रोहा येथील निवासी व अनिवासी इमारतींमधील विद्युत उपकरणांची वार्षिक तत्वावर देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹ १०,४८,६३९.०० |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक २२/०१/२०२५ ते दिनांक ०५/०२/२०२५ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक २७/०१/२०२५ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक २९/०१/२०२५ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

# सोशल मीडियावरील योजनांबद्दल सतर्क राहा

**पनवेल: रामप्रहर वृत्त**



फिनटेक क्षेत्रातील आघाडीची कंपनी एंजेल वन लिमिटेडने एंजल वनच्या नावाचा गैरवापर करणाऱ्या तसेच त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची नावे वापरून तोतयागिरी करणाऱ्या फसव्या सोशल मीडिया गटांच्या वाढत्या व्याप्तीबद्दल गुंतवणूकदारांना सतर्क करत असून एंजेल वनशी संबंध असल्याचा खोटा दावा करून, सोशल मेसेजिंग प्लॅटफॉर्मवर अनेक अनधिकृत गट तयार होत असल्याचे या कंपनीच्या निरीक्षणात आले आहे.

आवश्यक सेबी नोंदणी/परवानगीशिवाय सिक्युरिटीजशी संबंधित सल्ला किंवा शिफारसी प्रदान करणे, तसेच सेबी च्या मंजुरीशिवाय सिक्युरिटीजशी संबंधित परतावा आणि कामगिरीबद्दल अनधिकृत दावे करणे, अशा बेकायदेशीर गोष्टींमध्ये हे फसवे गट गुंतले आहेत, हे एंजेल वनने ओळखले आहे.

व्हॉट्सप आणि टेलीग्राम ग्रुप एंजल वन लिमिटेडचे ब्रँड नाव आणि लोगो तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांची नावे आणि प्रतिमा यांचा बेकायदेशीरपणे आणि भ्रामकपणे गैरवापर करत आहेत. आणि ते एंजल वन लिमिटेडशी संबंधित आहेत असा विश्वास ठेवत सर्वसामान्यांची दिशाभूल करत आहेत. अनधिकृतरित्या गुंतवणुकीचा सल्ला देणे किंवा सिक्युरिटीज मार्केटमध्ये परताव्याची हमी देणे हे कायद्याने निषिद्ध आहे. त्यामुळेच आम्ही गुंतवणूकदारांना योग्य ती माहिती घेण्यास तसेच आमच्या संस्थेकडून व्यवहार झाल्याचा किंवा माहिती मिळाल्याचा दावा करणाऱ्या कोणत्याही घटनेची सत्यता पडताळून पाहण्याचे आवाहन केले आहे.

कायदेशीर गुंतवणुकीचे निर्णय नेहमी सखोल संशोधन आणि अधिकृत स्त्रोतांकडून मिळालेल्या माहितीवर आधारित असावेत. एंजेल वन लिमिटेडचा कोणत्याही बनावट प्लिकेशन्स, वेब लिंक्स किंवा खासगी व्हॉट्सप/टेलीग्राम ग्रुप्सशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही संबंध नाही आणि फसव्या प्लिकेशन्स किंवा वेब लिंक्सच्या व्यवहारामुळे होणाऱ्या कोणत्याही आर्थिक नुकसानासाठी किंवा परिणामांसाठी ते जबाबदार राहणार नाहीत, असे एंजेल वनने म्हटले आहे. सर्व गुंतवणूकदारांना सतर्क राहण्यासाठी आणि त्यांच्या आर्थिक सुरक्षिततेचे रक्षण करण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घेण्यासाठी कंपनी प्रोत्साहन देते.अशा संस्थांशी जोडले जाऊ नका तसेच कोणत्याही संशयास्पद गोष्टींची माहिती त्वरित कायदेशीर यंत्रणांना द्या, असा सल्ला जनतेला दिला जातो. तुम्हाला कोणतेही संभाव्य घोटाळे आढळल्यास, ते सायबर क्राईम पोर्टलद्वारे cybercrime.gov.in तसेच १९३० या हेल्पलाइनवर कॉल करून किंवा तुमच्या जवळच्या पोलीस स्टेशनला भेट देऊन नोंदवले जाऊ शकतात, असेही त्यांनी नमूद केले आहे.

# प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहिमेत १५ हजार दंडवसुली, ३० किलो पिशव्या जप्त



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

प्रतिबंधात्मक प्लास्टिकचा वापर रोखण्यासाठी नागरिकांमध्ये जागरुकता निर्माण करण्याप्रमाणेच एकल वापर प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहीमा प्रभावीपणे राबविण्यात येत असून प्रतिबंधीत प्लास्टिक जप्त करण्यासोबतच दंडात्मक वसूलीही करण्यात येत आहे.

याकरिता भरारी पथकांमार्फत तपासणी कार्यवाही करण्यात येत असते. परिमंडळ २ च्या भरारी पथकाने उपआयुक्त डॉ. कैलास गायकवाड यांच्या नियंत्रणाखाली विभाग अधिकारी तथा सहा. आयुक्त संजय तायडे यांच्या माध्यमातून घणसोली विभागातील दुकानांमध्ये अचानक जाउन प्लास्टिक पिशव्या व एकल वापर प्लास्टिकची तपासणी केली. यामध्ये रॉयल फरसाण घणसोली, दिनेश फरसाण घणसोली व शिवशक्ती मार्ट घणसोली या तीन दुकानांमध्ये प्लास्टिक पिशव्या आढळून आल्याने त्यांच्या कडून प्रत्येकी ५ हजार या प्रमाणे एकूण १५ हजार दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली. त्यासोबतच ३० किलो प्लास्टिक पिशव्यांचा साठा जप्त करण्यात आला, अशी माहिती देण्यात आली.

# सीकेटी इंग्रजी माध्यमाचे २८ विद्यार्थी राज्यस्तरीय इंग्रजी मॅरेथॉन परीक्षेसाठी पात्र

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



चांगु काना ठाकूर विद्यालय इंग्रजी माध्यम माध्यमिक विभाग नवीन पनवेलच्या ३२पैकी २८ स्पर्धकांनी प्रतिष्ठित इंग्रजी मॅरेथॉन शाळास्तरीय परीक्षा यशस्वीपणे उत्तीर्ण करून राज्यस्तरीय स्पर्धेत स्थान मिळवले.

शाळेतील इंग्रजी भाषा तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांचे पाठबळ आणि पर्यवेक्षक ए.एल. नीरजा, शिक्षक कर्मचाऱ्यांचे योगदान यामुळे विद्यार्थ्यांनी ही कामगिरी दाखवली. इंग्रजी माध्यमाची प्रथम भाषा इंग्रजी सहज अवगत होण्याच्या दृष्टीने ही स्पर्धा महत्वाची आहे. त्यांचे यश शाळेच्या शैक्षणिक प्रणालीच्या प्रतिभेचे पालनपोषण आणि उत्द्रष्टता वाढवण्याच्या सर्वसमावेशक प्रयत्नांचे यश प्रतिबिंबित करते.

'आम्ही आमचे अध्यक्ष लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे अनमोल सहकार्य आणि दूरदृष्टीबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो. संधी उपलब्ध करून देण्याच्या त्यांच्या पुढाकाराने आमच्या विद्यार्थ्यांच्या यशात मोठा हातभार लावला आहे. त्यांच्या वाढीसाठी आणि उत्द्रष्टतेच्या वचनबद्धतेशिवाय हे यश शक्य झाले नसते,' असे मुख्याध्यापक चव्हाण म्हणाले .

यशस्वी विद्यार्थांचे संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, सचिव डॉ. एस.टी. गडदे, सर्व पदाधिकारी, पर्यवेक्षिका, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# अंध विद्यार्थ्यांसाठी ब्रेल लिपीमधील पुस्तके प्रकाशित

**नवी मुंबई : बातमीदार**




नवी मुंबईतील पत्रकार राजेंद्र घरत आणि नवी मुंबई महानगरपालिकेच्या नगरसचिव चित्रा बाविस्कर यांच्या अनुक्रमे रस आणि रसिक व मातीत ज्यांचे जन्म मळले तसेच जाम जेली आणि चॉकलेट व जगा स्वैर या ब्रेल लिपीतील पुस्तकांचे प्रकाशन ज्येष्ठ साहित्यिक दिलीप गडकरी यांच्या हस्ते करण्यात आले. स्नेह ज्योती निवासी अंध विद्यालय, घराडी, मंडणगड, जिल्हा रत्नागिरी येथे १९ जानेवारी रोजी हा पुस्तक प्रकाशन सोहळा पार पडला.

स्नेह ज्योती अंध शाळेत मुलामुलींना शिक्षणाप्रमाणेच अन्य विद्यां मध्येही तरबेज करवून घेतले जात असल्याने आनंद झाल्याचे यावेळी गडकरी यांनी या दृष्टिहीन मुलामुलींनी सादर केलेली गाणी ऐकून नमूद केले व अशा चांगल्या संस्थांचे काम सर्वदूर पोहचवायला, येथे पुन्हा यायला आवडेल असे सांगितले.

राजेंद्र घरत यांच्या सकारात्मक व समाजोपयोगी पत्रकारितेचे आपण साक्षीदार असून त्यांनी या संस्थेपर्यंत विविध व्यक्ती आणून त्यांना चांगला अनुभव देऊ केल्याचे सांगत या साऱ्या चांगल्या लोकांच्या सहकार्याने या अंधशाळेतील मुले राज्य व देशस्तराप्रमाणेच विश्वस्तरावरही गाजतील असा विश्वास गडकरी यांनी व्यक्त केला. नियतीने अन्याय केलेल्या या मुलामुलींवर मेहनत घेऊन ही अंधशाळा जणू इश्वरी कामच करीत असून यामुळेच आपले मराठीतील साहित्य ब्रेल लिपीमध्ये पुस्तकरुपाने आणणे, या शाळेमध्ये विविध नामांकितांना आणून त्यांना या कामाशी जोडून घेणे आपल्याला आवडते असे लेखक राजेंद्र घरत यांनी यावेळी आपल्या भाषणातून सांगितले.

येथील संस्थाचालकांच्या कामाने आपण प्रभावित असून आपल्या पुस्तक प्रकाशनासाठी मुख्याध्यापिका प्रतिभा सेनगुप्ता यांचे अनमोल सहकार्य लाभणे यामुळे लेखनाला नवे आयाम मिळाल्याची भावना मांडून भविष्यात या शाळेतील विद्यार्थीनींच्या विवाहप्रसंगी कन्यादान करण्याची जबाबदारी घेणे आवडेल अशी इच्छा लेखिका चित्रा बाविस्कर यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केली. या प्रसंगी स्नेह ज्योती संस्थेच्या अध्यक्ष आशाताई कामत, शाळेच्या मुख्याध्यापिका प्रतिभा सेनगुप्ता याही विचारमंचावर उपस्थित होत्या. सदर प्रसंगी येथील मुलामुलींसाठी नेलेला खाऊ, दैनंदिन उपयोगासाठी लागणाऱ्या चीजवस्तू, तांदुळ व अन्य सामान संस्थेकडे सोपवण्यात आले.

# सीकेटी कॉलेजमध्ये रस्ता सुरक्षा अभियान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चांगू काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, नवीन पनवेल (स्वायत्त) येथे राज्य रस्ता सुरक्षा अभियान या विषयावर कार्यक्रमाचे येथे आजीवन अध्ययन व विस्तार विभाग आणि आर.टी.ओ., पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार ( दि. २०) जानेवारी रोजी राज्य रस्ता सुरक्षा अभियान या विषयावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रसंगी आजीवन अध्ययन व विस्तार विभागचे समन्वयक प्रो. (डॉ.) बी. एस.पाटील यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. दिलीप दराडे, निरीक्षक, आर.टी.ओ., पनवेल आणि विजया चामे, सहाय्यक निरीक्षक, आर.टी.ओ., पनवेल यांनी सर्व विद्यार्थ्यांना राज्य रस्ता सुरक्षा अभियान या विषयावर मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमात रस्ता सुरक्षा विषयक नियम आणि त्याची अमलबजावणी कशी केली जाते याबाबत विविध अशा चित्रफितीच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या एकूण ११५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. (डॉ.) एस. के. पाटील, आय.क्यू.ए.सी.समन्वयक प्रो.(डॉ.) बी.डी.आघाव, यांनी कौतुक केले. तसेच महाविद्यालयातील सर्व विद्याशाखांचे प्रमुख, विविध विभागाचे प्रमुख आणि सर्व प्राध्यापक वर्गाने या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. एच.एस खरात, (डॉ). के.बी.ढोरे, प्रा.अतुल घाडगे, प्रो. कुशल कुराणी, प्रा. पूनम शिंदे, अनुप्रिता वाठारकर, प्रा. स्नेहा आर. पारिंगे आणि प्रा. नेहा एस. पोरजी, प्रा.स्वेता व्ही. हुंबरवाडी, आणि प्रा. सागर व्यवहारे, यांनी अथक परिश्रम घेतले.

कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख,पनवेलचे आमदार प्रशांत ठाकुर व संस्थेचे सचिव मा. डॉ. एस. टी. गडदे यांनी कौतुक केले.



# अंगण स्वच्छ, सुंदर ठेवणार त्याचा २६ला सत्कार होणार!

**खारघर : प्रतिनिधी**

पनवेलसह जिल्ह्यातील हजारो गावांमध्ये स्वच्छता अभियान जनजागृतीसाठी स्वच्छ माझे अंगण अभियान राबविण्यात येत आहे. हे अभियान २६ जानेवारीपर्यंत राबविण्यात येणार आहे. या अभियानात स्वच्छतेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कुटुंबांचा सन्मान करण्यात येणार असून, अभियानात सक्रिय सहभागी होण्याचे आवाहन रायगड जिल्हा परिषदेच्या वतीने करण्यात आले आहे.पनवेल तालुक्यातील ७१ ग्रामपंचायती मधील २०० पेक्षा जास्त गावांचा यामध्ये समावेश आहे.

ग्रामीण भागातील सर्व गावात दृश्यमान स्वच्छता राहावी. व सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन करणाऱ्या कुटुंबांना प्रोत्साहन देनेसाठी स्वच्छ माझे अंगण अभियान राबविण्यात येत आहे. यामुळे स्वच्छता सुविधा आपल्या घरात किंवा परिसरात उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला आहे.

स्वच्छ भारत मिशन टप्पा-२ अंतर्गत राज्य शासनाकडून 'स्वच्छ माझे अंगण' अभियान राबविले जात आहे. यामध्ये परसबाग, शोषखड्डा, अंगण, परिसरातील स्वच्छतेची पडताळणी समितीमार्फत केली जाणार आहे.

२१ ते २५ जानेवारी या कालावधीत पाच दिवस अभियान राबविण्यात येणार आहे. ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे सदस्य प्रत्यक्ष गृहभेटी देऊन या चार बाबी वापरात आहेत का याची माहिती ते घेणार आहेत. सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन करणाऱ्या कुटुंबांना प्रोत्साहन देनेसाठी स्वच्छ माझे अंगण अभियान राबविण्यात येत आहे. यामुळे स्वच्छता सुविधा आपल्या घरात किंवा परिसरात उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला आहे. गाव स्वच्छ, सुंदर राहण्यास याची मदत होणार असल्याने जास्तीत जास्त ग्रामस्थांनी यात सहभागी होऊन स्वच्छतेची व्याप्ती वाढवावी असे आवाहन करण्यात आले आहे.

# केबीपी कॉलेजमध्ये सांस्कृतिक महोत्सव; विद्यार्थ्यांचा सहभाग

**नवी मुंबई : बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये १३ ते १७ जानेवारीदरम्यान सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवात महाविद्यालयातील कला, विज्ञान, वाणिज्य व मॅनेजमेंट शाखेतील १७ विभागाचे विद्यार्थी सहभागी झाले होते. या महोत्सवाचे उदघाटन महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रो. डॉ. शुभदा नायक यांनी केले.

सदर महोत्सवात कला शाखेतील इंग्रजी, अर्थशास्त्र, भूगोल व मानसशास्त्र अशा विविध विभागाने पोस्टर प्रदर्शन , वाढती महागाई व शेक्सपियर लिखित नाटकावर नाट्य सादरीकरण, खगोलशास्त्रीय व भौगोलिक उपकरणाचे प्रदर्शन, मेंदू आणि अध्ययन प्रक्रिया यांचा सहसंबंध दाखविणाऱ्या प्रतिकृती विद्यार्थ्यांनी स्वतः तयार करून सादर केल्या.



कॉमर्स आणि मॅनेजमेंट विभागाने व्यापार व बँकींग क्षेत्रावर आधारित प्रतिकृती सादर केल्या. तर गणित , रसायनशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, भौतिकशास्त्र या विभागाने गणितीय आकृतींचे प्रदर्शन, इलेक्ट्रीसिटी आधारित उपकरणे , रासायनिक उपकरणे व कार्य यावर आधारित पोस्टर प्रदर्शानाचे आयोजन केले. आयटी , कॉम्प्युटर सायन्स , फूड टेक्नॉलॉजी व बायो टेक्नॉलॉजी या विभागाने यांत्रिक उपकरणे व त्यावर आधारित विविध खेळांचे आयोजन केले.

सांस्कृतिक विभागाच्यावतीने दि. १७ जानेवारीला कलांजली पर्व तिसरे अंतर्गत नृत्य, नाट्य, गायन व रॅम्प वॉक अशा स्पर्धांचे आयोजन केले. सांस्कृतिक विभागाच्या कार्यक्रमाला कर्नाटकी शास्त्रीय गायिका दिव्या विमल विशेष अतिथी म्हणून उपस्थित होत्या. सांस्कृतिक विभागाकडून आयोजित केलेल्या स्पर्धेतील विजेत्यांना महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शुभदा नायक व उपप्राचार्या डॉ. राजेश्री घोरपडे यांच्या हस्ते रोख बक्षिसे व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. सांस्कृतिक महोत्सव यशस्वी करण्यासाठी सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. आबासाहेब सरवदे, विद्यार्थी कौन्सिल चेअरमन डॉ. प्रतिभा देवणे, तसेच विविध विभागाचे प्रमुख व शिक्षक, शिक्षकेतर सेवकांनी विशेष प्रयत्न केले.

# सीवूड्समध्ये २४ जानेवारीपासून प्रॉपर्टी प्रदर्शन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**




नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ नगरीत आपल्या घराची स्वप्नपूर्ती करण्यासाठी नवी मुंबईतील सिवूड्स, पाम बीच रोड जवळ शुक्रवार २४ जानेवारी ते २७ जानेवारी २०२५ दरम्यान २३ वे मेगा प्रॉपर्टी प्रदर्शन भरवण्यात आले असल्याचे पत्रकार परिषदेत बीएएनएमचे अध्यक्ष वसंत भद्रा यांनी सांगितले.

नवी मुंबईतील बांधकाम व्यावसायिकांच्या बिल्डर असोसिएशन ऑफ नवी मुंबई (बीएएनएम) व क्रेडाई बिएएनएम,रायगड यांच्या वतीने यंदाही आपल्या स्वप्नातील घर घेणारयासाठी आणि प्रॉपर्टी गुंतूवणूकदारासाठी भव्य प्रॉपर्टी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले असून अभिनेत्री यामी गौतम प्रदर्शनातील मुख्य आकर्षण आहे. हे प्रदर्शन सकाळी दहा ते रात्री आठ पर्यंत सर्वासाठी खुले आहे.

या मेगाप्रॉपर्टी प्रदर्शनातून कनेक्टिंग नवी मुंबई व विमानतळाकडे लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. खारघर, नेरळ, खोपोली, कर्जत, रोहिंजण, तळोजा, पुष्पकनगर, द्रोणागिरी, उरण, उलवे, पामबीच, एनआरआय, सानपाडा ऐरोली आदी ठिकाणी महत्त्वाकांक्षी गृहप्रकल्प निर्माण करत असलेले शेकडो बिल्डर्स प्रॉपर्टी प्रदर्शनात सहभागी होणार आहेत.

नवी मुंबई आणि रायगड झपाट्याने विकसित होत आहे. नवी मुंबई अंतरराष्ट्रीय विमानतळ, मेट्रो, कोस्टल रोड, पनवेल -बदलापूर टनेल, वडोदरा -जेएनपीटी हायवे प्रोजेक्ट, खारघर -तुर्भे लिंक रोड, ऐरोली -कटाई नाका फ्रिवे, चिरनेर ते चौक रोड प्रोजेक्ट, तळोजा - बेलापूर कोस्टल रोड, टीपीएस आणि नैना प्रोजेक्ट, नविन खोपोली इंडस्ट्रीअल बेल्ट, ऐरोली नॉलेज पार्क, वर्ल्ड ट्रेड सेंटर खारघर, नेरुळ सायन्स पार्क, वाशी डेपो स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, मेरिटाईम युनिव्हर्सिटी, खारघर गोल्फ कोर्स आदि महत्वाकाक्षी प्रकल्प नवी मुंबई आणि रायगड परिसरात निर्माण झाले असून काही प्रगतीपथावर आहेत. त्यामुळे इथं आपल्या स्वप्नातील घरं घेणाऱ्यांची संख्या वाढत आहे.

या प्रदर्शनात १५ लाखापासून २५ करोड किंमत असलेली घरे व फ्लॅट उपलब्ध असून घरांची बुकिंग करणाऱ्यांसाठी लकी ड्रॉ असल्याचे अध्यक्ष वसंत भद्रा यांनी सांगितले.यावेळी व्यासपीठावर बीएएनएमचे अध्यक्ष वसंत भद्रा सचिव जिगर त्रिवेदी, भूपेंद्र शहा, विकी थॉमस, कोषाध्यक्ष करण सबलोक, शैलेश पटेल (संयोजक), प्रवीण पटेल, हितेश गामी, महेश पटेल, झुबिन संघोई (सह-संयोजक) आणि पॅराडाईज ग्रुपचे मधू भतिजा व मनिष भतिजा आदी उपस्थित होते.

# रोह्यात महाआरोग्य शिबिर

## २०० रुग्णांवर मोफत उपचार आणि औषध वाटप

**धाटाव : प्रतिनिधी**

मेंदू व मणका विकार तज्ज्ञ, हृदयरोग तज्ज्ञ, मेंदूविकार तज्ज्ञ, मानसोपचार तज्ज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत व रोटरी क्लब ऑफ रोहा, नगर परिषद आणि सूरज हॉस्पिटल सानपाडा यांच्या संयुक्त विद्यमाने रोह्यात महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी रुग्णांची तपासणी, उपचार करून औषधांचेही मोफत वाटप केले गेले.



या वेळी मेंदू व मणका विकार तज्ज्ञ डॉ. आर.एन. पाटील, हृदयविकार तज्ज्ञ डॉ. उदय पाटील, मेंदूविकार तज्ज्ञ डॉ. रमा पाटील, मानसोपचार तज्ज्ञ डॉ. अंजली पाटील, या डॉक्टरांनी मेंदूच्या आजारांवर, मटक्याचे आजारांवर, मानसिक विकार, हृदयविकार, ऑर्थोपेडिक आदीचे अनेक रोगांची तपासणी करून मोफत उपचार केले व शिबिर आयोजकांनी मोफत औषध वाटप केले.

या शिबिराविषयी अधिक माहिती देताना हृदयविकार तज्ज्ञ डॉ. उदय पाटील म्हणाले, महात्मा फुले योजनेंतर्गत हे शिबिर आयोजित केले आहे. आमच्या सूरज हॉस्पिटल सानपाडा येथे ही योजना सुरू झाली आहे. याचा फायदा रुग्णांना घेता येईल आणि लवकर मी रोह्याचे डॉ. अशोक जाधव यांच्या हॉस्पिटलमध्ये आठवड्यात एक दिवस बसणार आहे. त्याचा फायदाही येथील हृदयविकार रुग्णांना घेता येणार आहे आणि पुढील काळात अशा प्रकाराची शिबिरे वारंवार घेण्याचा मानस आहे.

रोटरी क्लब ऑफ रोहाचे अध्यक्ष किरण ताठरे म्हणाले, हे शिबिर सर्वांसाठी आहे. याचा लाभ घ्यावा. पुढील काळात रोटरी क्लबतर्फे महिलांच्या आरोग्याविषयी शिबिर व विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबिर आयोजित करायचे आहे. आताच काही महिने आधी रोटरी क्लबने महाड येथे विकलांग लोकांसाठी शिबिर आयोजित केले होते. त्यात आम्ही कृत्रिम हात-पाय गरजूंना बसवून दिले.

आज या शिबिरासाठी उपस्थिती राहिलेल्या सर्व मान्यवरांचे सर्व डॉक्टर व त्यांची टीम तसेच सहकार्य करणाऱ्यांचे मनापासून आभार मानतो, धन्यवाद देतो आणि असेच सहकार्य राहील याची अपेक्षा करतो, असे ताठरे म्हणाले.

या शिबिराचा २०० लोकांनी लाभ घेतला. या वेळी विजय मोरे, विनोद पाशिलकर, संतोष पोटफोडे, महेश कोलटकर महेंद्र गुजर, जिल्हा आयुष अधिकारी डॉ. विश्वनाथ देशमुख, पत्रकार अरुण करंबे, अमित मोहिते, जयवंत मुंडे, रोहिदास पाशिलकर, अनंता देशमुख आदी उपस्थित होते.

शिबिर यशस्वी करण्यासाठी रोटरी क्लब ऑफ रोहाचे अध्यक्ष किरण ताठरे. सचिव प्रदीप चव्हाण, खजिनदार वरुण दिवाण यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व सभासद व रोटरी महिलांनी परिश्रम घेतले. या वेळी बहुसंख्य रोहेकर नागरिकांनी उपस्थिती दर्शविली.

# अंगणवाडी सेविका प्रशिक्षणाचा शुभारंभ

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांच्या वतीने पोषण भी पढाई भी या अंगणवाडी सेविका प्रशिक्षणाचे आयोजन मुरुड दरबार हॉलमध्ये करण्यात आले होते.

या वेळी सहाय्यक गटविकास अधिकारी प्रकाश शिंदे, बालविकास प्रकल्प अधिकारी प्रफुल बागल, मुरूड प्रकल्प विस्तार अधिकारी सांख्यिकी संजय शेंडगे, प्रवेक्षिका सुर्वणा चांदोरकर, शुभांगी कोतवाल, आशा सोनकुसरे, अदानी फाऊंडेशनच्या प्रकल्प अधिकारी जयश्री काळे, विजया खेऊर, किरण शिंदे, सर्व अंगणवाडी सेविका, मदतनीस आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन तसेच सावित्रीबाई फुले, छत्रपती शिवाजी महाराज, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करून करण्यात आले.

या वेळी अंगणवाडी सेविका, मदतनीस यांना मार्गदर्शन करताना सहाय्यक गटविकास अधिकारी प्रकाश शिंदे म्हणाले की पोषण भी पढाई भी या कार्यक्रमाचा उद्देश लहान मुलांच्या पोषणाबरोबरच त्यांच्या शिक्षणालाही प्रोत्साहन देणे हा आहे. बालकांच्या पोषणाचा दर्जा सुधारणे, बालकांचे आरोग्य चांगले राहावे यासाठी प्रोत्साहन देणे, बालकांना अनौपचारिक शिक्षण देणे, बालकांच्या वजनात वाढ करण्याची पद्धत, शालेय शिक्षणासाठी तयार करणे याबाबत प्रशिक्षण दिले जाणार आहे. अंगणवाडी सेविकांनी या तीन दिवसीय प्रशिक्षणाचा चांगला उपयोग करावा, असे आवाहन सहाय्यक गटविकास अधिकारी प्रकाश शिंदे यांनी केले.

बालविकास प्रकल्प अधिकारी प्रफुल बागल यांनी अंगणवाडी सेविका, मदतनीस यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, अंगणवाडी सेविकांच्या माध्यमातून बालकांचा सर्वांगीण विकास व बौद्धीक क्षमता वाढवणे, बाल शिक्षणात आवश्यक टिचींग लर्निंग मटेरियल तयार करून त्यांचा उत्कृष्टपणे वापर करणे, सक्षम अंगणवाडी केंद्र उभारणे हा या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश आहे. हे प्रशिक्षण तीन दिवस म्हणजे १९ जानेवारी ते २१ जानेवारी या कालावधीत चालणार आहे. यामध्ये अंगणवाडी यांच्या परीक्षा घेतल्या जाणार आहेत. प्रशिक्षणामधून अंगणवाडी सेविकांनी पोषण भी पढाई भी हे प्रशिक्षण सार्थ करावे, असे आवाहन बालविकास प्रकल्प अधिकारी प्रफुल बागल यांनी केले. अदानी फाऊंडेशन च्या प्रकल्प अधिकारी जयश्री काळे यांनीही मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजया खेऊर यांनी केले, तर उपस्थितांचे आभार मुरूड प्रकल्प विस्तार अधिकारी सांख्यिकी संजय शेंडगे यांनी मानले.

# जिल्हाधिकाऱ्यांकडून वेश्वीत शासकीय रोपवाटिकेची पाहणी

**रायगड : रामप्रहर वृत्त**

अलिबाग तालुक्यातील शासकीय रोपवाटिका वेश्वी येथे यावर्षी एक लाख बांबूची रोपे निर्मितीचे इष्टांक देण्यात आलेला आहे. त्याची तयारी सुरू झालेली असून बांबूचे बियाणे वाफ्यावर टाकण्यात आले आहेत. रोपाची निर्मितीची प्रक्रिया सुरू झालेली आहे. जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी रविवारी (दि. १९) तेथे भेट देऊन पाहणी केली.



महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत रोपवाटिका निर्मिती आणि विशेषतः बांबू रोपाची निर्मिती करण्याचा नाविन्यपूर्ण प्रयोग शासकीय रोपवाटिका वेश्वी येथे सुरु आहे. या उपक्रमाचे जिल्हाधिकारी श्री जावळे यांनी कौतुक केले. या माध्यमातून शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी बांबूचे महत्त्व विशद करत भविष्यामध्ये मोठ्या प्रमाणावर बांबू लागवडीची पूर्वतयारी चांगल्या प्रकारे सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्ह्यातील बचत गट, महिला बचत गट तसेच शेतकऱ्यांना बांबू लागवडीसाठी प्रोत्साहित करण्यासाठीचा उपक्रम अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचे जिल्हाधिकारी यांनी यावेळी सांगितले. भविष्यातील बांबूची मागणी पूर्ण करण्यासाठी शासकीय रोपवाटिका तसेच स्वयं सहायता गट यांनी पुढाकार घेऊन बांबू लागवडी प्रोत्साहन देण्याचा मानस व्यक्त केला.जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर सामूहिक वनहक्क पट्टे (सीएफआर) दिलेले असून सदर रोपं निर्माण झाल्यावर ही रोपं प्रामुख्याने जिल्ह्यातील सामूहिक वनहक्क जमिनीवर (CFR) लागवड करण्याचे नियोजन असल्याबाबत जिल्हाधिकारी यांनी यावेळी अधोरेखित केले. गडचिरोली जिल्ह्यातील मेंढालेखा हे गाव सीएफआर च्या अशा शाश्वत व्यवस्थापनातून समृद्ध झाल्याने या गावाचे उदाहरण जिल्हाधिकारी जावळे यांनी सांगितले.

रायगड जिल्ह्यात वनविभाग रोहा यांच्या ५ रोपवाटिका, वनविभाग अलिबाग यांच्या १५ रोपवाटिका, सामाजिक वनीकरण विभागाच्या १४ रोपवाटिका आणि कृषी विभागाच्या ७ रोपवाटिका अशा एकूण ४१ रोपवाटिकांमध्ये ३० लक्ष बांबू रोपं लागवडीचे नियोजन आहे.

या वेळी जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.भरत बास्टेवाड, कृषी उपसंचालक श्री थिगळे, उपविभागीय कृषी अधिकारी श्री वानखेडे, तालुका कृषी अधिकारी श्री. भगत, रोपवाटिकेचे कृषी अधिकारी श्री गावडे, कृषिसेवक श्री. तिडके व इतर अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# कलोते ग्रामपंचायतीमध्ये माझी वसुंधरा ५.० उपक्रम

**चौक : प्रतिनिधी**

माझी वसुंधरा ५.० अंतर्गत खालापूर तालुक्यातील कलोते ग्रुप ग्रामपंचायतीने विविध पर्यावरणपूरक आणि सामाजिक उपक्रम राबविण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे दुर्गम भागातील आदिवासी भागात विकास उपक्रम सुरू झाले आहेत.

कलोते ही आदिवासीबहुल ग्रामपंचायत असून अनेक वाड्या, वस्त्या डोंगर भागात आहेत. आदिवासी जनतेसाठी काम करण्यास वेगळी ऊर्जा मिळते, असे ग्रामपंचायत अधिकारी निलेश म्हसकर यांनी सांगून माझी वसुंधरा ५.० अंतर्गत राबवित असलेल्या उपक्रमांची माहिती दिली.

माझी वसुंधरा उपकमांतर्गत कलोते ग्रामपंचायतीने कांढरोली तर्फे वनखळ हनुमान मंदिर येथे आदिवासी बांधवांचे वन हक्क दावे शिबिर आयोजित करून त्या संदर्भातील माहिती दिली व अर्ज भरून घेतले. श्रीयांश हॉस्पिटलच्या माध्यमातून आरोग्य शिबिर घेऊन तपासणी करून औषधोपचार देण्यात आले. प्राथमिक शाळांमधून वाचन आणि वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. प्लास्टिक पिशव्या बंदी, वृक्षारोपण करून त्याची जोपासना करण्यासाठी कटिबद्ध राहण्याचा संकल्प सोडण्यात आला. स्वच्छता अभियानही राबविण्यात येत असून सर्व ग्रामस्थ अभियान यशस्वी करण्यासाठी झटत आहेत.






# रोहा तालुका पेन्शनरांची सभा

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुका ईपीएस-९५ पेन्शनरधारकांची सभा नुकतीच रोहा विठ्ठल मंदिर येथे आयोजित करण्यात आली होती. सभेस २५०पेक्षा जास्त पेन्शनर उपस्थित होते.

या सभेत मालू पाबरेकर, दगडू बामुगडे यांनी कमांडरसाहेबांच्या नेतृत्वाखाली ईपीएस-९५ पेन्शनवाढीसाठी चालू असलेल्या लढ्याची सविस्तर माहिती दिली तसेच पुढील काळात संघटना बळकट करण्यासाठी सर्वांनी असेच संघटित राहण्याचे आवाहन केले. या वेळी उपस्थित काही सभासदांनी कमांडर यांच्या नेतृत्वाखाली आपल्या विभागात एकदा सभा घेण्यात यावीत, असे सुचविले.

प्रारंभी वसंत शेलार यांनी उपस्थितांचे स्वागत केले. सभेचे सूत्रसंचालन नंदकुमार भादेकर यांनी केले, तर देवराम कर्णेकर यांनी सर्वांचे आभार मानले.



# आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

**माणगाव : प्रतिनिधी**

समाजसुधारक, धर्मरक्षक प्रचारक विष्णूबुवा ब्रह्मचारी यांच्या २००वी जयंती निमित्ताने विष्णूबुवा ब्रह्मचारी सामाजिक केंद्र माणगाव रायगड आणि बी. के. एल. वालावलकर रुग्णालय डेरवण रत्नागिरी यांच्या संयुक्त विद्यमाने विनामूल्य आरोग्य तपासणी शिबिर आयोजन २३ जानेवारी रोजी सकाळी १० ते दुपारी ३ शिरवली येथे करण्यात आले आहे.

या शिबिरात नाक, कान, घसा, डोळे, किडनी, कॅन्सर, स्त्रीरोग, अस्थिरोग जनरल फिजिशियन डॉक्टर्सकडून रुग्णांची प्राथमिक तपासणी केली जाईल. ज्या रुग्णांना पुढील तपासणी व वैद्यकीय उपचारांची आवश्यकता आहे, त्यांना डेरवण रुग्णालयात पाठविण्यात येईल.

# सर्वांसाठी न्याय ही संकल्पना सर्वत्र पोहचावी -राजंदेकर

**रायगड : रामप्रहर वृत्त**

विधी सेवा समितीच्या माध्यमातून जिल्हा व तालुका स्तरावर विधी सेवा समितीकडून वेळोवेळी कायदेविषयक मार्गदर्शन शिबिरे घेण्यात येत असतात. विधी सेवा समितीकडून अनेक बाबतीत मोफत कायदेविषयक सेवा पुरविली जाते. विधी सेवा समितीच्या या कार्याची माहिती सर्वांना व्हावी तसेच सर्वांसाठी न्याय ही संकल्पना सर्वत्र पोहचावी यासाठी हे शिबिर महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन जिल्हा व प्रमुख सत्र न्यायाधीश व जिल्हा विधी सेवा समितीचे अध्यक्ष ए.एस. राजंदेकर यांनी केले.

नागोठणे येथील रिलायन्स पेट्रोकेमिकल्स कंपनीच्या बालगंधर्व रंगभवन सभागृहात रविवारी (दि. १९) झालेल्या विधी सेवा महशिबिर, शासकीय सेवा व योजनांच्या महामेळाव्यात राजंदेकर बोलत होते. या वेळी त्यांनी जिल्हा व तालुका स्तरावर विधी सेवा समितीकडून राबविले जाणारे विविध उपक्रम व सेवांची माहिती उपस्थितांना दिली.



या शिबिरास रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे, रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, जिल्हा सरकारी वकील ॲड. संतोष पवार, अलिबाग बार असोसएशनचे अध्यक्ष ॲड. प्रसाद पाटील, जिल्ह्यातील न्यायालयांतील न्यायाधिश, शासनाच्या विविध खात्याचे अधिकारी, जिल्हा व जिल्ह्यातील तालुका विधी सेवा समितीमधील वकीलवर्ग, अनेक मान्यवर, शासकीय कर्मचारी तसेच बचत गटाच्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, उच्चशिक्षित व्यक्तींनाही कायद्याचे ज्ञान नसते. त्यामुळे राष्ट्रीय विधी सेवा समितीने भविष्यात शाळेय स्तरावर कायद्याची तोंड ओळख देणारे विषय अभ्यासक्रमात समाविष्ट करावेत असे मत व्यक्त केले. याचवेळी त्यांनी महसूल खात्याकडून राबविल्या जाणाऱ्या विविध महत्त्वकांक्षी योजनांची सखोल माहिती दिली.

रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बाष्टेवाड यांनी सामान्य प्रशासनाच्या विविध प्रकारच्या कर वसुलीमध्ये लोक अदालतीचा होणारा उपयोग सांगितला तसेच त्यांच्या प्रशासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना आणि ग्रामीण भागातील सुमारे साडे अठरा हजार बचत गटांचे कार्य तसेच इतर बाबतीत महत्त्वपूर्ण अशी माहिती दिली.

या महामेळाव्यात शासनाच्या विविध खात्यांकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती देणारे २० स्टॉल लावण्यात आले होते. याच कार्यक्रमात शासनाच्या विविध खात्यांमधील लाभार्थ्यांना धनादेश तसेच वस्तूंचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा विधी सेवा समितीचे सचिव अमोल शिंदे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार रोहा कनिष्ठ स्तर न्यायालयातील प्रमुख न्यायाधीश सुनील महाले यांनी मानले. या विधी सेवा शिबिर, शासकीय सेवा व योजनांचा महामेळाव्यासाठी रिलायन्स कंपनीचे सहकार्य मिळाले.

# माजी विद्यार्थ्यांनी जागवल्या शाळेच्या आठवणी

## एकमेकांच्या सुखदुःखात सहभागी होण्याचा निर्धार




**पाली : प्रतिनिधी**

न्यू इंग्लिश स्कूल म्हसळ्याच्या २००२च्या इयत्ता दहावी बॅचमधील विद्यार्थ्यांनी एकत्र येत आपल्या शाळेच्या आठवणी जाग्या केल्या. येणाऱ्या काळात अशाच पद्धतीने दरवर्षी स्नेहसंमेलन आयोजित करून एकमेकांच्या सुखदु:खात सहभागी होण्याचे या वेळी ठरविण्यात आले.

शिक्षण घेतल्यानंतर गेली अनेक वर्ष आपापल्या क्षेत्रामध्ये वावरत असताना मित्र-मैत्रिणींना एकत्र करण्याची संकल्पना मनात धरून न्यू इंग्लिश स्कूल म्हसळ्याच्या इयत्ता दहावीच्या बॅचमधील विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी तब्बल २३ वर्षांनी पुन्हा एकत्र येत स्नेहसंमेलन साजरा केले. या वर्षी पनवेल येथे सर्वजण फार्महाऊसवर सकाळी १० वाजता एकत्र आले. चहा, नाश्ता करून सर्वांनी आपले कुटुंब, रोजगाराबाबत माहिती दिली.

या वेळी बालपणी शाळेत झालेल्या घडामोडींना उजाळा मिळाला. आपल्याच एका मैत्रिणीला सर्वांनी सढळ हस्ते मदत केली. या वेळी राजेंद्र आणि पुष्पा यांनी आपल्या बालमित्रांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या फ्रेम आठवण म्हणून दिल्या. या वेळी शशांक निजामपूरकर, शशांक करडे, विनोद, पुष्पा, राजेंद्र, ललिता यांनी नियोजन करून कार्यक्रम पार पाडण्यात मदत केली.

# माजी मंत्री महादेव जानकर यांची वावोशी कार्यालयाला सदिच्छा भेट

**खोपोली : प्रतिनिधी**

राष्ट्रीय समाज पक्षाचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी मंत्री महादेव जानकर यांनी नुकतीच वावोशी येथील पक्ष कार्यालयाला भेट दिली आणि कार्यकर्त्यांच्या भेटी घेऊन त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या.

या वेळी कोकण प्रदेशाध्यक्ष भगवान ढेबे, युवा नेते आबासाहेब पुकळे, आनंद हिरवे, आनंद ढेबे, अविनाश निरगुडकर, कीर्ती भोसले, मनीषा ठाकूर, मुकेश भगत, नवनाथ पाटील, राम केंडे, विजय उघडे आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

माजी मंत्री महादेव जानकर यांनी भगवान ढेबे यांना कोकणची नवीन कार्यकारिणी तयार करून पक्षाची मोर्चेबांधणी करावी आणि येणाऱ्या निवडणुकांसाठी तयार राहण्याचे आदेश या वेळी दिले.



# मुरूडजवळील एकदरा डोंगराला वणवा

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील एकदरा येथील गायमुख डोंगरावर रात्रीच्या वेळी वणवा लागून मोठ्या प्रमाणावर आग पसरली होती. या वणव्यामुळे वनसंपदा आणि वन्यजीव नष्ट होण्याच्या मार्गावर दिसत आहेत.



मुरूड तालुका हा निसर्गाने नटलेला आहे. या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वनक्षेत्र असून यात अनमोल अशा औषधी वनस्पती आहेत. हे सर्व दैनंदिन लागत असलेल्या आगीत नष्ट होताना दिसत आहेत. त्यामुळे पर्यावरणातील संतुलन बिघडण्यासाठी हे वणवे कारणीभूत ठरत आहेत.


**महाराष्ट्र शासन**

जलसंपदा विभाग

कार्यकारी अभियंता, खारभुमी सर्वेक्षण व अन्वेषण विभाग, पेण, जि. रायगड,

फेर- ई- निविदा सूचना क्रमांक २१ सन २०२४-२५

| अ.क्र. | कामाचे नांव | निविदेची अंदाजित किंमत रुपये (उपकर व रॉयल्टी इ. कर अंतर्भूत) |
|---|---|---|
| १) | माणकुले सोनकोठा हशिवरे खारभूमी योजना,ता. अलिबाग, जि. रायगड या योजनेच्या नुतनीकरणाचे काम. | १२,६६,६५,३८४/- |

निविदा उपलब्ध कालावधी :- दिनांक २१.०१.२०२५ ते ०१.०२.२०२५ पर्यंत

ई - निविदा उघडणे :- दिनांक ०३.०२.२०२५

सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास खालील वेबसाईटवर कळविण्यात येईल

http://mahatenders.gov.in

सही/-

(वि. पां. पाटील)

कार्यकारी अभियंता, खारभुमी सर्वेक्षण व अन्वेषण विभाग, पेण-रायगड.

